रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ३०
www.ramprahar.com
◆ रविवार, १६ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
माथेरान, नेरळ आणि कर्जत पर्यटकांनी बहरले / २
'एकही आदिवासी बांधव कुडाच्या घरात राहणार नाही' / ६
केएल राहुलने मोडला गौतम गंभीरचा रेकॉर्ड! / ८

## लोककलेच्या नावाखालील अश्लीलतेला लागणार लगाम!



**मुंबई :** लावणीसह लोककलेच्या नावाखाली होणाऱ्या अश्लील प्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आता लावणी व लोककला सादर करणाऱ्या कलाकारांना सरकारच्या रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाकडून 'सुटेबिलिटी सर्टिफिकेट' घ्यावे लागणार आहे. नृत्यप्रकारात अश्लील कृत्य नसल्याचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच कार्यक्रमाला परवानगी दिली जाईल. राज्यात कार्यक्रम करण्यापूर्वी आयोजकांच्या माध्यमातून हे प्रमाणपत्र पोलिसांसमोर सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतरच कार्यक्रमाची परवानगी मिळेल, असे सांस्कृतिक विभागाने स्पष्ट केले आहे. सार्वजनिक ठिकाणी लावणी, तमाशा, लोकनाट्य, लोकसंगीत आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी संहिता आणि निवेदनाची तपासणी करून हे प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आले आहे.

# 'मानसिक नक्षलवाद' ओळखा आणि दूर करा

## लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींचा निशाणा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना शनिवारी (दि. १५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नक्षलवाद आणि माओवादाच्या मुद्द्यावरून जोरदार हल्ला चढवला. जंगलांमध्ये सक्रिय असलेल्या सशस्त्र नक्षलवाद्यांविरोधातील लढ्यात देशाला मोठे यश मिळाले असले तरी माओवादी विचारसरणीचा प्रभाव असलेल्या तथाकथित 'मानसिक नक्षलवाद्यां'ना ओळखून त्यांना समाजापासून वेगळे करणे आवश्यक आहे, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, अनेक वर्षांपासून माओवादी विचारसरणीच्या लोकांनी देशातील सत्ताकेंद्रांमध्ये विविध पदे भूषवली. काही जण सरकारी समित्यांवर सल्लागार म्हणून कार्यरत राहिले आणि धोरणांवरही या विचारसरणीचा प्रभाव पडला. जंगलांमध्ये बंदूक हाती घेऊन हिंसाचार करणाऱ्या नक्षलवाद्यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात कमी करण्यात यश आले असले तरी विचारांच्या माध्यमातून हिंसा आणि अराजकतेला खतपाणी घालणारे लोक अद्याप सक्रिय असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

समाजाला चुकीच्या दिशेने नेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगत मोदी म्हणाले, या मानसिक नक्षलवाद्यांना ओळखणे आणि त्यांना वेगळे करणे गरजेचे आहे. भारताला विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर देशातील तरुण पिढीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे लागेल. सुरक्षित भारताची उभारणी करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून आव्हान देशाच्या सीमेच्या आतून असो किंवा बाहेरून, भारत प्रत्येक परिस्थितीला सामोरे जाण्यास सज्ज आहे.

२१व्या शतकातही अनेक दशकांपासून सुरू असलेल्या आव्हानांचा कायमस्वरूपी सामना करणे आवश्यक असल्याचे मोदी म्हणाले. नक्षलवाद आणि माओवादामुळे लाखो तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त झाले. अनेक मातांनी आपली मुले गमावली, तर असंख्य पालकांची स्वप्ने धुळीस मिळाली. नक्षलवादाने देशातील मोठ्या भागाला तब्बल चार दशके बंदुकीच्या धाकाखाली ठेवले. या हिंसाचारात संविधान आणि लोकशाही मूल्यांवरही घाला घालण्यात आला. देशाच्या नागरिकांचे संरक्षण करताना ३५००हून अधिक सुरक्षा कर्मचारी शहीद झाले. युद्धजन्य परिस्थितीपेक्षाही अधिक जवानांना या संघर्षात प्राण गमवावे लागल्याचे मोदी यांनी नमूद केले. नक्षलवादी हिंसाचाराने अनेक भाग रक्तरंजित केल्याचेही त्यांनी सांगितले.

### २०१४मध्ये केला होता नक्षलवादमुक्तीचा संकल्प

२०१४मध्ये जनतेने सत्तेची संधी दिल्यानंतर देशाला नक्षलवादाच्या विळख्यातून मुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला होता, असे मोदी यांनी सांगितले. आज नक्षलवादी व माओवादी हिंसेची ताकद मोठ्या प्रमाणात कमकुवत झाली असून एकेकाळी रक्तरंजित संघर्षासाठी ओळखल्या जाणाऱ्या भागांमध्ये आता विकास, विश्वास व प्रगतीचा तिरंगा फडकत आहे, मात्र हे आव्हान पूर्णपणे संपले आहे, असे समजून त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये, असा इशाराही पंतप्रधानांनी दिला. सशस्त्र हिंसेसोबतच समाजात अराजकता आणि हिंसक विचार पसरविणाऱ्या प्रवृत्तींनाही ओळखून त्यांचा मुकाबला करणे आवश्यक असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले.

### गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंग

स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही पंतप्रधानांनी मोठी घोषणा केली. गरीब, मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार शिक्षण व मार्गदर्शन सहज उपलब्ध व्हावे यासाठी मोफत ऑनलाइन कोचिंगचे व्यापक नेटवर्क उभारले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### एक कोटी तरुणांना मोफत एआय ट्रेनिंग!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांच्या भवितव्याला केंद्रस्थानी ठेवत अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय कौशल्य प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षांसाठी मोफत ऑनलाइन कोचिंग आणि क्रीडा क्षेत्रातील गुणशोध मोहिमेद्वारे नव्या पिढीला अधिक सक्षम करण्यावर त्यांनी भर दिला. पंतप्रधान मोदींनी देशातील तब्बल एक कोटी तरुणांना एआयशी संबंधित कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याची घोषणा केली. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात भारतीय तरुणांनी जागतिक स्पर्धेसाठी सज्ज व्हावे, रोजगाराच्या नव्या संधी मिळवाव्यात आणि डिजिटल अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावावी यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.



## उलवे नोड परिसरात देशभक्तीपर वातावरणात स्वातंत्र्य दिन साजरा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचा ८०वा स्वातंत्र्य दिन गव्हाण व उलवे परिसरात अत्यंत जल्लोषात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. गव्हाण येथील छत्रपती शिवाजी विद्यालय आणि जनार्दन आत्माराम भगत ज्युनियर कॉलेजमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे येथे विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून परिसरातील विविध शासकीय व सामाजिक संस्थांमध्येही ध्वजारोहण सोहळे पार पडले. कोपर येथील जिल्हा परिषद शाळेत अनंता ठाकूर यांच्या हस्ते, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात युवा नेते वैभव घरत यांच्या हस्ते, तर गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवक विजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण सोहळ्यानंतर गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये गावातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या सोहळ्यास भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, कामगार नेते महेंद्र घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, माजी सदस्या योगिता भगत, उषा देशमुख, कामिनी कोळी, ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील, जयवंत देशमुख, साईचरण म्हात्रे, किशोर पाटील, कमलाकर देशमुख, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, शेलघर अध्यक्ष अमृत भगत, **(पान २ वर..)**

## निवडक

### अरुणाचलमध्ये पावसाचा कहर; लष्कराचे पाच जवान बेपत्ता

**नवी दिल्ली :** अरुणाचल प्रदेशात शुक्रवारी सायंकाळी झालेल्या मुसळधार पावसात दिबांग घाटी जिल्ह्यात अचानक आलेल्या महापुरात भारतीय लष्कराचे दोन शेल्टर्स वाहून गेले. तसेच यावेळी लष्कराचे पाच जवानही बेपत्ता झाले आहेत. बेपत्ता जवानांचा शोध सुरू आहे. आणखी एका घटनेत अप्पर सुबनसिरी जिल्ह्यात भीषण भूस्खलनात चार मजुरांचा दबून मृत्यू झाल्याची माहिती आहे.

### ध्वजारोहणाला जाताना तीन मैत्रिणींचा बसच्या धडकेत मृत्यू

**हिंगणघाट :** स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेत ध्वजारोहणाला जाणाऱ्या १५ ते १७ वयोगटातील तीन शाळकरी मुलींचा बसच्या धडकेत मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना हिंगणघाट येथे घडली. आंबेडकर शाळेजवळ त्यांच्या दुचाकीला मागून एका खासगी ट्रॅव्हल्स बसने जोरदार धडक दिली. समृद्धी धामसे, आरुही चवरे आणि मिसबा शेख अशी अपघातात मृत्यू झालेल्या मुलींची नावे आहेत.

## देशप्रेमाचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवूया -आमदार प्रशांत ठाकूर



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांचे आणि स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आपण कधीही विसरता कामा नये. आज आपला देश प्रत्येक क्षेत्रात वेगाने प्रगती करीत आहे. ही प्रगती आणि देशप्रेमाचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत अभिमानाने पोहोचवायचा असेल, तर आपल्यालाही पूर्ण ताकदीने तयार व्हावे लागेल, असे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

कामोठे येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल इंग्लिश मीडियम व ज्युनिअर कॉलेजमध्ये ८०वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे चेअरमन तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी भारतभूमीबद्दल देशभक्तीपर मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्यात विविध शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी भारतभूमीचे गुणगान करणारे मनमोहक नृत्य सादर केले तसेच शिस्तबद्ध कवायत संचलन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

सोहळ्याला पनवेल महापालिकेचे प्रभाग समिती क चे अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक हॅप्पी सिंग, **(पान २ वर..)**



**पनवेल : देशाच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात मोठ्या उत्साहात ध्वजारोहण व ध्वजवंदन करण्यात आले. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात येथील महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, महिला मोर्चा अध्यक्षा रुचिता लोंढे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## पाच समुद्रकिनाऱ्यांची ब्लू फ्लॅगसाठी निवड

### डेन्मार्कचे पथक करणार पाहणी



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पाच प्रमुख समुद्रकिनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय 'ब्लू फ्लॅग' मानांकन मिळवण्यासाठी पर्यटन विभागाने तयारी सुरू केली आहे. डेन्मार्कचे पथक लवकरच या किनाऱ्यांची पाहणी करणार आहे.

परदेशातील समुद्रकिनाऱ्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातील किनारे स्वच्छ, सुरक्षित व पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त करण्यासाठी राज्याच्या पर्यटन विभागाने नवीन प्रकल्प हाती घेतला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'ब्लू फ्लॅग' मानांकन मिळविण्यासाठी राज्यातील लाडघर, गुहागर, नागाव, श्रीवर्धन आणि डहाणू या पाच समुद्रकिनाऱ्यांची प्रायोगिक तत्त्वावर निवड करण्यात आली. या मानांकनासाठी आवश्यक असलेले ३३ निकष पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून तयारी सुरू आहे. काही दिवसांत डेन्मार्कस्थित संबंधित आंतरराष्ट्रीय समितीचे पथक या पाचही समुद्रकिनाऱ्यांची पुन्हा पाहणी करणार आहे.

ब्लू फ्लॅग मानांकन केवळ समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्यावर किंवा पर्यटक सुविधांवर दिले जात नाही. पर्यावरणीय शिक्षण, समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता, पर्यावरणीय व्यवस्थापन तसेच पर्यटकांची सुरक्षा व सेवा अशा प्रमुख क्षेत्रांतील एकूण ३३ निकषांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे निवडलेल्या पाचही किनाऱ्यांवर आवश्यक सुविधा उभारण्याबरोबरच पर्यावरणीय निकषांची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान पर्यटन विभागासमोर आहे. कोकण किनारपट्टीवरील पाच समुद्रकिनारे मानांकनासाठी पात्र ठरले. देशातील १३ किनाऱ्यांची या पथकाने पाहणी केली होती.

## महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' -मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई : प्रतिनिधी**

विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' आहे. महाराष्ट्राचा विकास करताना शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासोबतच महाराष्ट्राला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा राज्य शासनाचा संकल्प आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. १५) येथे केले.

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, क्रांतिकारक तसेच देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन करून मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मंत्रालय येथे भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले, यावेळी ते बोलत होते.

ध्वजारोहणानंतर मुख्यमंत्र्यांनी उपस्थित प्रशासकीय, सेनादल अधिकारी, निमंत्रित नागरिकांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य असून यंदाच्या पहिल्या सहामाहीतील आर्थिक विकासदर ८.८ टक्के असल्याचे त्यांनी सांगितले.

## रायगडात ९६ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण

### अलिबाग, पेण, कर्जत, पनवेलमधील काम अंतिम टप्प्यात



**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यात सध्या सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेंतर्गत रायगड जिल्ह्यातील काम अंतिम टप्प्यात पोहचले आहे. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे. रायगडमध्ये मतदार गणना पत्रकांचे ९६ टक्के डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार रायगड जिल्ह्यात गणना पत्रकांचे सुमारे ९६ टक्के डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील सर्व सात विधानसभा मतदारसंघांमध्ये बूथस्तरीय अधिकारी घराघरांत जाऊन मतदारांना गणना पत्रकांचे वाटप करत असून भरून आलेल्या पत्रकांची माहिती मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन प्रणालीमध्ये नोंदविण्याचे काम वेगाने सुरू आहे.

प्रत्येक पात्र मतदाराची माहिती अद्ययावत करून पारदर्शक व विश्वासार्ह मतदार यादी तयार करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, रायगड जिल्ह्यातील सुमारे २५.३३ लाख मतदारांपैकी २४.३० लाखांहून अधिक गणना पत्रकांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाने १०० टक्के डिजिटायझेशन पूर्ण केले असून अलिबाग, पेण, महाड, उरण, कर्जत आणि पनवेल मतदारसंघांमध्येही काम अंतिम टप्प्यात आले आहे. दरम्यान, या विशेष मोहिमेला १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाने १०० टक्के कामकाज पूर्ण करत रायगडातील पहिला विधानसभा मतदारसंघ होण्याचा मान मिळविला. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा व रोहा या तालुक्यांतील ३५१ मतदान केंद्रांचा समावेश आहे. या मतदारसंघात एकूण दोन लाख ६२ हजार ६८० मतदार आहेत.

# 'विकसित महाराष्ट्राच्या संकल्पातून कोकणला विकासाचे नवे मॉडेल बनवूया'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याचा अमृतकाळ पार करत विकसित भारताच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू असून विकसित भारताच्या संकल्पातून प्रगत महाराष्ट्र घडविताना कोंकण विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. 'तिसरी मुंबई', वाढवण बंदर, रेवस–रेड्डी सागरी महामार्ग, आधुनिक पायाभूत सुविधा आणि स्थानिक कृषी व पर्यटन अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या विविध प्रकल्पांच्या माध्यमातून कोकणच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. हा विकास स्थानिक भूमिपुत्र, शेतकरी, मच्छीमार, महिला, युवक आणि पर्यावरणाचे हित केंद्रस्थानी ठेवून शाश्वत पद्धतीने करण्यात येईल, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी केले. ८० व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात मंत्री कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले. त्याप्रसंगी जनतेला उद्देशुन शुभेच्छा संदेश देतांना त्या बोलत होत्या.



यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, कोंकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीणा, विभागीय अपर आयुक्त सिद्धाराम सालीमठ, नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कु. तटकरे म्हणाल्या, स्वातंत्र्य दिन हा केवळ राष्ट्रध्वजाला सलाम करण्याचा दिवस नसून, देशाच्या विकासासाठी आपली जबाबदारी अधोरेखित करणारा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाचा सहभाग आणि शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे हे लोकशाहीचे सामर्थ्य आहे.पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञान, उद्योग, स्टार्टअप, शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून महाराष्ट्राला नवी उंची देण्यास शासन कटिबद्ध आहे. आर्थिक विकासासोबत सामाजिक न्याय, सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक विकासावर भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू आणि मुंबई महानगर प्रदेशाशी जोडलेल्या विकासामुळे कोकणाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. रायगड–पेण ग्रोथ सेंटरमधून उद्योग, तंत्रज्ञान, फिनटेक, डेटा सेंटर आणि रोजगाराच्या संधी वाढणार आहेत.मोठ्या विकास प्रकल्पांमध्ये भूमिपुत्र, शेतकरी, मच्छीमार, महिला, युवक आणि पर्यावरणाचे हित केंद्रस्थानी ठेवण्यात येईल. स्थानिकांना रोजगार व कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गट, स्वयंरोजगार, कौशल्यविकास आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यात येत आहे. महिलांना विकासाच्या प्रक्रियेतील सक्रिय भागीदार बनविण्याचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक बालकाला सुरक्षित बालपण, शिक्षण, आरोग्य आणि समान संधी मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. अनाथ, निराधार, दिव्यांग आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी विविध योजना राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते पोलीस सेवा तसेच विविध शासकीय विभागात उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास नवी मुंबई पोलीस सहआयुक्त दिपक साकोरे, नवी मुंबई पोलीस अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे, अपर आयुक्त (महसूल) श्रीमती वैशाली इंदानी–उंटवाल, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) श्रीमती फरोग मुकादम, सह आयुक्त (करमणूक) रविंद्र पवार, सह आयुक्त (रोहयो) संदीप पवार, अपर आयुक्त (विकास आस्थापना) मिनल कुटे, उपायुक्त (नियोजन) प्रमोद केंभवी, अपर आयुक्त (विकास) माणिक दिवे, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, माजी सैनिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माथेरान, नेरळ, कर्जत पर्यटकांनी बहरले; हजारो पर्यटकांचा लोंढा, वाहतूक कोंडी



**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान, नेरळ आणि कर्जत परिसरात सलग आलेल्या सुट्ट्या आणि १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनामुळे पर्यटकांची मोठी गर्दी उसळली. शनिवारच्या दिवशी तब्बल ५० हजारांहून अधिक पर्यटक दाखल झाल्याने माथेरान हाऊसफुल झाले, तर नेरळपासून माथेरान घाटापर्यंत वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडी निर्माण झाली. घाटातील कोंडीमुळे माथेरानमध्ये हॉटेल बुकिंग करून आलेले अनेक पर्यटक दुपारपर्यंत घाटातच अडकून पडले.

माथेरानला जाण्यासाठी पहाटेची पहिली ट्रेन पकडून सकाळी साडेपाच–सहाच्या सुमारास नेरळ स्थानकात उतरलेल्या पर्यटकांनी टॅक्सी पकडण्यासाठी रांग लावली. काही वेळातच ही रांग सुमारे ७०० मीटरपर्यंत वाढून नेरळ बाजारपेठेपर्यंत पोहोचली, तर दुसऱ्या बाजूची रांग कर्जत–बदलापूर महामार्गापर्यंत गेली. माथेरान सेवा देणाऱ्या सुमारे २७० टॅक्सी घाटातील वाहतूक कोंडीत आणि कर्जत बदलापूर मार्गावर अडकल्याने त्या वेळेत नेरळला पोहोचू शकल्या नाहीत, त्यामुळे सकाळी ११ वाजेपर्यंत गर्दी आणखी वाढत गेली.

टॅक्सीच्या रांगेत अडीच तास थांबूनही वाहन न मिळाल्याने काही पर्यटकांनी माथेरानचा बेत रद्द करून माघारी जाणे पसंत केले, तर काहींनी पायीच घाटाची वाट धरली. नेरळहून नांगरखिंड मार्गे पर्यटक पायी जुमापट्टीपर्यंत पोहोचले. माथेरान गाठणे शक्य नसल्याने काहींनी घाटातील धबधब्यांवरच जाउन पर्यटनाचा आनंद लुटला.

## कोर्लई हायस्कूल येथे संगणक दालनाचे आमदार तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन

**मुरुड : प्रतिनिधी**

सध्याचे जग हे स्पर्धात्मक असून नोकरी अथवा विविध क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी नवीन आलेले तंत्र शिकता आले पाहिजे. आजचा शालेय विद्यार्थी नवीन येणाऱ्या तांत्रिक कंपन्या अथवा व्यवसायाला आवश्यक आहे ते शिकून प्रगत होण्याची परंपरा आता वृद्धिंगत होत असून जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तसेच स्पर्धेच्या युगात सामना करण्यासाठी संगणकाबरोबरच ए आय तंत्र शिकणे खूप आवश्यक असल्याचे मत आमदार अनिकेत तटकरे यांनी व्यक्त केले आहे.

मुरुड तालुक्यातील कोर्लई येथील माऊंट कार्मेल हायस्कूल येथे संगणक कक्षाचे उद्धघाटन फीत कापून आमदार अनिकेत तटकरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले .यावेळी ते आपल्या मार्गदर्शन भाषणात बोलत होते .माऊंट कार्मेल हायस्कूल येथे वरदाताई तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट कडून पाच संगणक भेट स्वरूपात देण्यात आले आहेत .

सदरील कार्यक्रम प्रसंगी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, मुरुड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत ,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ , कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती संतोष कांबळी ,राष्ट्रवादी सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन , माऊंट कार्मेल हायस्कूल चे चेरमन फादर बोनाव्हेंचर नुनीस ,मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी माजी सरपंच अजित कासार , माजी सरपंच मनीष नांदगावकर , संतोष पाटील आदी सह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

यावेळी आमदार अनिकेत तटकरे आपल्या भाषणात म्हणाले कि शालेय विद्यार्थ्यांनी क्रीडांगण क्षेत्रात व कला क्षेत्रात सुद्धा उन्नती करावी .स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी आम्ही रोहा येथे विशेष दालन निर्माण केले असून यामधून एमपीएसची व युपीएसची परीक्षा पास होऊन आपल्या रायगड जिल्ह्याचे नावलौकिक वाढवावे अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली .माऊंट कार्मेल हायस्कूल चे चेरमन फादर बोनाव्हेंचर नुनीस यांनी शालेय विद्यार्थयांसाठी संगणक दिल्याबद्दल तटकरे कुटुंबाबद्दल आभार व्यक्त केले .सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षता म्हात्रे यांनी केले .कार्यक्रमासाठी पालक व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सचे सीडीसी सदस्य दीपक शिंदे , जयदास तेलवणे , तपासे सर, अनिल खोपडे , रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सच्या प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे तसेच प्राचार्या डॉ. निशा नायर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या मार्चपासने झाली. शिस्तबद्ध पद्धतीने मार्चपास करत विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवरांना मानवंदना देत त्यांचे स्वागत केले.

मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि अभिमानास्पद वातावरणात पार पडला. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून टाकला. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य तसेच विविध कलाविष्कार सादर करून स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला आणि देशप्रेमाला अभिवादन केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रमाला देशभक्ती, उत्साह आणि आनंदाची झालर लाभली. "देशप्रेम, एकता आणि जबाबदार नागरिकत्व" यांचा संदेश देत स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमास प्राचार्या डॉ निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

## सीकेटी विद्यालयात ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि. १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव डॉ.एस टी गडदे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



स्वातंत्र्यदिनाच्या या कार्यक्रमास जयराम मुंबईकर, हरचंदसिंग सग्गु, तसेच सीकेटी संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे ,उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, स्टेट बोर्ड स्कूल्स इन्स्पेक्टर संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, निवृत्त मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, माध्यमिक मराठी विभागाचे पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर , कला व वाणिज्य विभाग पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील, इंग्रजी माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधूरी ,इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच विद्यार्थी, पालक ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

समारंभ अध्यक्ष डॉ. एस टी गडदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांचे त्यांनी कौतुक केले व संस्थेच्या माध्यमातून सर्वांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणे हे आमचे कर्तव्य आहे व उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

या समारंभात पूर्व प्राथमिक, प्राथमिक,माध्यमिक,व उच्च माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या कलागुणांचे सादरीकरण केले. त्यामध्ये पूर्व प्राथमिक विभागाच्या छोट्यामुलांनी सरस्वती माता,लोकमान्य टिळक, मातृभाषा मराठी या वेशभूषा साकारून सुंदर सादरीकरण केले.माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर समूहगीत सादर केले.इंग्रजी माध्यमिक विभागाच्या तनिष्का गावडे या विद्यार्थिनीने भाषणातून स्वातंत्र्याविषयीचे विचार व्यक्त केले .

पान १ वरुन

### उलवे नोड परिसरात देशभक्तीपूर्ण वातावरणात स्वातंत्र्य दिन साजरा

वामनशेठ म्हात्रे, कोळी समाजाचे नेते विश्वनाथ कोळी, रघुनाथ देशमुख, भाऊ भोईर, सुधीर ठाकूर, वैभव ठाकूर, मनोज घरत, रामदास ठाकूर, अजय भगत, कांबळे गुरुजी, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, जयश्री घरत, राजकिरण कोळी, मनीषा ठाकूर, सुजाता पाटील, गव्हाण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, सागर रंधवे यांच्यासह सर्व स्थानिक ग्रामस्थ, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### देशप्रेमाचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवूया –आमदार प्रशांत ठाकूर

नगरसेविका शीला भगत, हेमलता गोवारी, भाजप नेते भाऊ भगत, राजेश गायकर, रवी गोवारी, आशा भगत, बाळासाहेब कारंडे, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, अविनाश कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातर्फे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे, चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाची माजी विद्यार्थिनी डॉ. चारुस्मिता जतीनबडगुजर व तिचे वडील भगवान बडगुजर आणि विद्यालयातील बालवाडी विभागातील सेवानिवृत्त शिक्षिका जयश्री सावंत यांची उपस्थिती लाभली तसेच पालक प्रतिनिधी रेणू पळसकर, श्रुती जाधव, मनीषा घरत, स्वाती ठाकूर, स्वाती घरत, विभाग प्रमुखमा. स्वाती काळे मुख्याध्यापिका इंग्रजी माध्यमिक विभाग, हरिश्चंद्र ठाकूर पर्यवेक्षक मराठी माध्यमिक विभाग, मुख्याध्यापक सुभाष मानकर या मान्यवरांचीउपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात पूजन व दीप प्रज्वलनाने झाली विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी प्रमुख अतिथींचे व मान्यवरांचे श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.कार्यक्रमात विविध स्पर्धांची पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देऊन विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्तीप्राप्त केलेल्या कु.स्वरा योगेश जुईकर हिला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

**उरण : रामप्रहर वृत्त**

द्रोणागिरी विभागातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती. भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात देशाचा ८० वा स्वातंत्रता दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी चंद्रकांत घरत ( चेअरमन भागुबाई चांगु ठाकूर विद्यालय )यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी.स्वतंत्रता दिनाचे औचित्य साधून विद्यालयात वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत वेगवेगळे नृत्य सादर करत तसेच देशभक्तीपर गाणी गात कार्यक्रमाची शोभा वाढवली.

याप्रसंगी कु.वेदांत बुरांगे,कु.श्लोक पाटील यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी सुनील पाटील ,शेखर तांडेल,सुरेश पाटील,सीमा घरत सदस्य स्कूल कमिटी तसेच पालक प्रतिनिधी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## उधारी मागितल्याने केली मारहाण

**नवीन पनवेल :** सिगारेटचे आणि मागील उधारीचे पैसे मागितल्याने त्याचा राग मनात धरून दोघांना मारहाण केल्याचा प्रकार खारघर येथे उघडकीस आला. या प्रकरणी हरनेक सिंग पन्नू याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात १४ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी हरिराम यादव हे खारघर, सेक्टर १९ येथे राहत असून १३ ऑगस्ट रोजी रात्री सव्वा अकराच्या सुमारास ते आणि रवींदर हे पान टपरीवर काम करत होते. हरनेक सिंग यांनी त्या ठिकाणी सिगारेट घेतला त्याच्याकडून सिगारेटच्या आणि मागच्या उधारीचे पैसे मागितल्याने त्याने हरिराम याला शिवीगाळ आणि मारहाण केली.

## महिलेने दागिने चोरले

**नवीन पनवेल :** घरी काम करणाऱ्या महिलेने सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात १४ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. विवेक कुमार मिश्रा हे खारघर येथे राहत असून १२ ऑगस्ट रोजी रात्री अकराच्या सुमारास ते ऑफिस मधून घरी आले. त्यांच्या पत्नीने कपाटाची पाहणी केली असता कपाटात दागिने आणि सोने सापडून आले नाही.

# पनवेल तालुक्यात ८०वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीमय वातावरणात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेतर्फे आज स्वातंत्र्यदिनाचा ध्वजारोहण समारंभ उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात संपन्न झाला. पनवेल महानगरपालिका मुख्यालयातील छत्रपती संभाजी महाराज मैदान येथे आयोजित या कार्यक्रमात महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला.

या कार्यक्रमास आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता प्रितम म्हात्रे, स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर, आमदार विक्रांत पाटील तसेच महापालिकेचे नगरसेवक, नगरसेविका, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त अभिषेक पराडकर , उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त मंगला माळवे, सहायक आयुक्त डॉ.रूपाली माने, बाळाराम रातांबे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना महापौर नितीन पाटील म्हणाले की, अनेक स्वातंत्र्य वीरांच्या बलिदानातून हे स्वातंत्र्य मिळाले आहे. आपण सर्वजण देशवासीयांनी देशाला प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. भारत देशाला सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन यानिमित्ताने त्यांनी केले. स्वातंत्र्यदिनानिमित्त महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशाच्या एकता, अखंडता आणि प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प केला.

यावेळी विविध मान्यवर, ज्येष्ठ नागरिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यासाठी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल तसेच पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन करून मानवंदना दिली.



**पनवेल :** स्वातंत्र्य हा केवळ उत्सव नसून राष्टाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव आहे. या प्रेरणादायी भावनेतून सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात, जल्लोषात आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजराकरण्यात आला. या सोहळ्यात शाळेचे चेअरमन तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट प्रेम, देशभ‍ी, राष्टीय एकात्मता व सामाजिक बांधिलकीचीभावना रुजावी या उद्देशाने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विविध उपक्रमांचेआयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावी देश भक्तीपर भाषणे, योगासनांचे प्रात्यक्षिक, आकर्षक रिंग डान्स, विविध देशभ‍ेपिर वेशभूषाआणि देशप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मनेजिंकली.

यावेळी परेश ठाकूर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. देशाच्या प्रगतीत योगदान देणारे जबाबदारनागरिक म्हणून घडताना शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त आणि राष्ट प्रेमाची मूल्येअंगी बाळगावीत, असा संदेश त्यांनी आपल्या भाषणात विद्याथ्याना दिला. याप्रसंगी व्यसनमुक्त भारत घडवूया, निरोगी व सक्षम पिढी निर्माण करूया!असा दृढ निर्धार करतसर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली.या सोहळयास विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर यांच्यासह स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर, कविता खारकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, राजेशखारकर, धीरज ओवळेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



**पनवेल :** तोंडरे येथील डीएपी पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन सोहळ्यात भारतीय जनता पार्टी कामगार आघाडीचे अध्यक्ष रवी नाईक यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट ध्वजालामानवंदना दिली.या ध्वजारोहण सोहळ्यास स्कूल कमिटीचे चेअरमन अभिमन्यू पाटील,जिल्हाकामगार आघाडीचे सचिव बाळाराम पाटील,कार्यालयीन सचिव मधुकर उरणकर,प्रसिद्धीप्रमुख राजपाल शेगोकार, श्याम भगत, शाळेचे मुख्याध्यापक गावंड उपस्थित होते.





## शिवाजीनगर जि.प. शाळेत कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**गव्हाण :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवाजी नगर– गव्हाण येथे भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त कृष्णाशेठ ठाकूर यांचे ध्वजारोहण हस्ते करण्यात आले.

यावेळी व्ही.के .ठाकूर , टि.के.ठाकूर ,गजानन ठाकूर, विजय ठाकूर,धनंजय ठाकूर शनिदास ठाकूर,शशिकांत ठाकूर ,किशोर ठाकूर ,हिराशेठ ठाकूर ,किसन ठाकूर ,सुरेश ठाकूर,शिरीष कडू , राधाबाई ठाकूर, भास्कर पाटील , वैभव ठाकूर,जगदिश ठाकूर,निलेश ठाकूर,विरेंद्र ठाकूर, नारायण ठाकूर नितीन ठाकूर, नितीन बा.ठाकूर ,हरजिवन ठाकूर, बाळकृष्ण ठाकूर, रसिकलाल कानडा, सुरक्षा ठाकूर, हुमा दास , शाळेतील शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थीत होते.

राष्ट्रध्वजाला मानवंदना देत विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून टाकला यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणातून स्वातंत्र्याविषयीचे विचार व्यक्त केले. कृष्णाशेठ ठाकूर यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील हुतात्मा स्मारक येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा पार पडला. यावेळी स्वातंत्र्यसैनिक हिरवे गुरुजी यांचेउत्तराधिकारी प्रदीप तुळशीराम हिरवे यांच्या शुभहस्ते राष्ट ध्वज फडकवून मानवंदना देण्यात आली.

या प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाला उजाळा दिला. ज्या थोर स्वातंत्र्यवीरांच्या अद्वितीय बलिदानामुळे आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे, त्यांचे विस्मरण आपल्याला कधीही होता कामा नये. देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण सर्वांनी पक्षभेद व मतभेद बाजूलासारून एकत्र येऊन काम करणे काळाची गरज आहे असे ते म्हणाले. हिरवेगुरुजींनी आपल्या कौटुंबिक हिताचा त्याग करत गोवा मुक्ती संग्रामात घेतलेला सहभाग आणि दिलेले योगदान देश कधीही विसरू शकत नाही, अशा भावना ही त्यांनी व्यक्त केल्या.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारघरमध्ये समाजोपयोगी उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक जण सामाजिक उपक्रम राबवित आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून खारघर सेक्टर ३, बेलपाडा येथील बालाजी अंगण, अजय माळी यांच्या कार्यालयात NCMC कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा १८५ महिला व ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला.

या उपक्रमाचे आयोजन प्रभाग क्रमांक ५ चे अध्यक्ष अजय माळी, खारघर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे आणि महिला मोर्चाच्या अध्यक्षा साधनाताई पवार यांच्या पुढाकाराने करण्यात आले. खारघर शहरात एकूण तीन ठिकाणी NCMC कार्ड नोंदणी शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी पहिले शिबिर सेक्टर १२ येथे यशस्वीपणे पार पडले, तर दुसरे शिबिर दि. १४ ऑगस्ट रोजी सेक्टर ३, बेलपाडा येथे घेण्यात आले. तिसरे शिबिर दि. १५ ऑगस्ट रोजी सेक्टर ११ येथील शनी मंदिरात आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराला भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भेट देऊन आयोजकांना प्रोत्साहन व सहकार्य केले. याप्रसंगी ठाणे आगाराचे वाहतूक अधिकारी सचिन मारुती पवार यांनी प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन केले. याशिवाय नगरसेवक शत्रुघ्न काकडे, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, उद्योग आघाडी संयोजक मामा मांजरेकर, संतोष कट्टी मनी, संदीप कासार, मेघनाथ म्हात्रे, वैशाली देसाई, एस. टी. कांबळे, आटवणकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिबिराला भेट दिली.



# ओवळे येथे शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गावाच्या सर्वसमावेशक विकासासाठी सवारनी एकत्र येऊन हातभार लावला पाहिजे.भविष्यात प्रगती साधायची असेल, तर मुलांना उत्तम शिक्षण देणे अत्यंत गरजेचेआहे. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून गावाच्या विकासासाठी एकत्र काम केले,तरच खऱ्या अर्थाने प्रगती साध्य होईल, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेतेरामशेठ ठाकूर यांनी ओवळे येथे शाळेला इमारतीच्या उद्घटनावेळी केले.

रायगड जिल्हा परिषदेअंतर्गत ओवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या जिल्हा खनिकर्म योजनेतून ओवळे येथील रायगडजिल्हा परिषद केंद्र शाळेची नवीन इमारत बांधण्यात आली आहे. या नवीन इमारतीचा भव्य उद्घाटन सोहळा शनिवारी अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्यातमाजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शाळेच्या नूतन इमारतीचे उदघाटन करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणमिळावे आणि त्यांच्यासाठी आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यादृष्टीने ही नवीन इमारत अत्यंत मोलाची ठरणार आहे.

या सोहळ्यास उरणचे आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, पंचायतसमितीच्या सभापती रंजना वास्कर, २७ गाव समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी,जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, सोनाली जितेकर, पंचायत समिती सदस्यामनीषा पाटील, माजी सरपंच सुभाषशेठ म्हात्रे, सरपंच रुपेश गायकवाड, उपसरपंचआनंदी चंद्रकांत पाटील, सरपंच मंगेश शेलार, रायगड जिल्हा परिषद उच्च केंद्रशाळा ओवळेचे अध्यक्ष राकेश गायकवाड, माजी सरपंच सदाशिव वासकर, आर.आर. वासकर, माजी उपसरपंच गजानन पाटील, रवींद्र दापोळकर, धीरज पाटील,युवा नेते मनखुश नाईक, मच्छिंद्र कटेकर, तुळशीराम भाऊ घरत, ओबीसी सेलउपाध्यक्ष सुनील पाटील, प्रशांत घरत, सुरेश गायकवाड, जे. एल. पाटील, प्रकाशवाजेकर, बळीराम गायकवाड, केंद्रप्रमुख उद्धार मॅडम यांच्यासह विविध संस्थांचेपदाधिकारी, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तालुका क्रीडा संकुलात मुख्य शासकीय ध्वजारोहण

**पनवेल :** देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन शनिवारी पनवेलमध्ये अत्यंत देशभक्तीपूर्ण वातावरणातव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पनवेल येथील तालुकाक्रीडा संकुलात आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळयात पनवेलचे प्रांतअधिकारी पवन चांडक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमालाभाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते.

ध्वजारोहण सोहळयानंतर क्रीडा संकुलाच्या प्रांगणात भरवण्यात आलेल्या विविधऔषधी रानभाज्यांच्या प्रदर्शनाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. त्यांनी प्रदर्शनातील रानभाज्यांची पाहणी करून आयोजकांचे कौतुक केले व उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.







**श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं बहरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...**

**श्रावण संपेपर्यंत आपण स्वत: शब्दबद्ध केलेल्या कविता 'रामप्रहर'मध्ये दररोज एक याप्रमाणे (एका कवीची एकच कविता) येत्या सोमवारपासून प्रसिद्ध करण्यात येणार आहे.**

**कवींनी आपली अप्रकाशित कविता स्वत:च्या छायाचित्रासह 'रामप्रहर'कडे टाईप करून पाठवावी. त्या कवितेला 'श्रावणधारा' या सदराखाली यथायोग्य प्रसिद्धी देण्यात येईल.**

**–मुख्य संपादक**

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड,**
**गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.**
E.mail : ramprahar@gmail.com
**व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ७७३८१०६००९**






# राम तेरी गंगा मैली @४१ वर्षे

## राज कपूरच्या दिग्दर्शनातील शेवटचा चित्रपट

### झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

चित्रपटाच्या नावात त्याचं व्यक्तिमत्त्व अथवा ओळख व्हायला हवी. त्यातही दिग्दर्शक दिसतो. राज कपूरच्या दिग्दर्शनातील चित्रपटाचे ते खास वैशिष्ट्य. चित्रपटाच्या पोस्टरवरही त्या चित्रपटाबाबत उत्सुकता वाढायला हवी. राज कपूर दिग्दर्शित चित्रपटाबाबत तसं दिसते.

'राम तेरी गंगा मैली' या चित्रपटाबाबतही असेच दिसते. हा चित्रपट मुंबईत १६ ऑगस्ट १९८५ रोजी प्रदर्शित झाला. म्हणजेच त्याच्या प्रदर्शनास एकेचाळीस वर्ष पूर्ण होत आहेत. यात आणखी एक फिल्मी योगायोग असा, रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' मुंबईत १५ ऑगस्ट १९७५ रोजी मिनर्व्हा चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आणि बरोबर दहा वर्षांनी त्याच मिनर्व्हा चित्रपटगृहात राम तेरी गंगा मैली प्रदर्शित झाला आणि पब्लिकने पहिल्याच खेळापासून हाऊसफुल्ल गर्दीत टाळ्या शिट्ट्यानी एन्जॉय केला.

मला आठवतंय मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकाना याच मिनर्व्हा चित्रपटगृहाची पहिल्या दिवशीच्या पहिल्या खेळाची तिकिटे दिली होती आणि चित्रपट रसिकांसोबत चित्रपट पाहण्याचा अनुभव दिला होता. आर. के. फिल्म निर्मित चित्रपटांचे आम्हा चित्रपट समीक्षकांसाठीचे खेळ चेंबूर येथील आर. के. स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये दाखवत असा माझा अनुभव. ती प्रथा बाजूला ठेवून आम्हा चित्रपट समीक्षकाना जनसामान्यांसोबत हा चित्रपट दाखवावा हा निर्णय या चित्रपटाचे प्रसिद्धी प्रमुख बनी रुबेन यांचा असावा असे बरेच दिवस मला वाटत होते. काही महिन्यांनी बनी रुबेन यांनीच सांगितले, तो निर्णय रणधीर कपूरचा होता. त्यामुळे १४९९ अशी अतिशय विशाल आसन क्षमता असलेल्या भव्य दिव्य आणि मिनर्व्हा चित्रपटगृहात मुंबईतील आम्ही सर्वभाषिक मिळून तीस सिनेपत्रकार होतो. त्यातील अनेकांनी 'हा चित्रपट राज कपूरच्या क्लासचा नाही' अथवा 'या चित्रपटात राज कपूरच्या दिग्दर्शनातील आवारा, बरसात, मेरा नाम जोकरचा टच दिसत नाही' असं म्हटलं. हा चित्रपट समिक्षकाना फारसा आवडला नाही, प्रेक्षकांना मात्र आवडला आणि या चित्रपटाने मिनर्व्हा चित्रपटगृहातच पन्नास आठवड्याचा खणखणीत मुक्काम केला. चित्रपटाच्या जगात यश हेच सर्वाधिक मोठे चलनी नाणे. तेच महत्व देते, तेच ग्लॅमर देते.

राम तेरी गंगा मैली या चित्रपटाच्या नावाची घोषणा झाली तेव्हा चित्रपटसृष्टी, चित्रपट रसिक आणि चित्रपट प्रसार माध्यमे यांत या नावावरुन काहीसं अचंबित व्हायला झाले होते. रणधीर कपूरने एका ठिकाणी गंमतीत म्हटले, राज कपूर पौराणिक चित्रपट बनवत आहेत.

राज कपूर चित्रपट माध्यम आणि व्यवसाय यांची अतिशय उत्तम जाण असलेला फिल्मवाला. त्यानं उगाच का, राम तेरी गंगा मैली असं आपल्या चित्रपटाचे नाव ठेवले असेल? या चित्रपटात राजीव कपूर नायक असणार हे निश्चित होते. पण नायिका कोण हा फारच कुतुहल वाढवणारा प्रश्न होता. राज कपूरच्या दिग्दर्शनातील चित्रपटाची नायिका हा कधीही सरळ साधा सोपा विषय नव्हता. फार उत्सुकता वाढत असे आणि अनेक नावे चर्चेत असत. गॉसिप्स मॅगझिनमधून त्यांवर रंगवून खूलवून वाढवून शिजवून लिहिलं जाई. आणि एके दिवशी नाव आलं, मंदाकिनी. ही कोण? तर उत्तर प्रदेश येथील मेरठ येथील एक युवती. राज कपूरचे फाईड आहे ना, म्हणजे निवड अगदी परफेक्ट असणार याची खात्री. हा राज कपूरमधील दिग्दर्शकावरचा विश्वास होता. राज कपूरची हीदेखील एक मिळकत आहे.

चित्रपटाच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रणाच्या बातम्या येऊ लागल्या. फोटोही आले. चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या बातम्या आल्या. असं करत करत दिवस पुढे सरकत सरकत होते आणि १९८५ च्या मध्यास दोन गोष्टी घडल्या. राम तेरी गंगा मैली चित्रपटाची ध्वनिमुद्रिका आणि ध्वनिफित प्रकाशित झाली आणि राज कपूरच्या दिग्दर्शनातील चित्रपटाचे गीत संगीत दर्जेदार असतं याचा सकारात्मक प्रत्यय आला आणि गाणी ऐकता ऐकता लोकप्रिय झालीदेखिल. राज कपूर दिग्दर्शित चित्रपटातील गाणी हा एक स्वतंत्र असा कौतुकाचा विषय. गाण्याच्या माध्यमातून पटकथा पुढे सरकत असे.

राम तेरी... चित्रपटाचे संगीतकार रवींद्र जैन. या चित्रपटातील सर्वाधिक सुपरडुपर हिट गाणं सून सायबा सून हसरत जयपुरी यांनी लिहिले आहे. मै हू मै हू हे गाणे अमीर कजलबाग यांनी लिहिले आहे. उर्वरित गाणी रवींद्र जैन यांची आहेत. तुझे पुकारे ये मेरी बाहे, एक दुखियारी करे, राम तेरी गंगा मैली हो गयी, एक राधा एक मीरा, यारा हो यारा, हुस्न पहाडो का....असे प्रत्येक गाणे लोकप्रिय. रणधीर कपूरने कपिल शर्मा शोमध्ये एकदा असे सांगितले, राम तेरी गंगा मैली या चित्रपटातील गाणी अगोदर लिहिली गेली, त्याला चाली बांधल्या आणि मग त्यावरून पटकथा संवाद लिहिले. हे केवळ आणि केवळ जबरदस्त प्रतिभा असेल तर आणि तरच साध्य होते. या चित्रपटाचं लेखन राज कपूर, के. के. सिंग, वसंत साठेसाहेब आणि ज्योती स्वरुप यांचे आहे. कला दिग्दर्शन सुरेश सावंत यांनी केले आहे आणि छायाचित्रणकार राघु कर्माकार आहे.

हा चित्रपट पूर्ण झाला आणि चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीचा एक वैशिष्ट्यपूर्ण फंडा म्हणून आम्हा सिने पत्रकारांना या चित्रपटातील तीन फोटो पाठवले गेले. धबधब्याच्या पायथ्याशी बसलेली चिंब चिंब झालेली मंदाकिनी, राजीव कपूर आणि मंदाकिनी यांचे चुंबन दृश्य आणि मंदाकिनी एका तान्हुल्या बाळाला घेऊन बसली आहे. त्या काळात हे फोटो धाडसी ठरले. यावरुन उलटसुलट चर्चा रंगली. सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातील झीनत अमानचे ग्लॅमरस रुपडे पुन्हा एकदा चर्चेत आले. कोणी राज कपूरला शो वुमन असेही म्हटले. चित्रपट प्रदर्शनाचा दिवस अगदी जवळ आला आणि या चित्रपटातील अन्य प्रसंगांची छायाचित्रे आम्हा सिनेपत्रकाकडे आली. मिनर्व्हा चित्रपटगृहात वरच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंतच्या लांबलचक थियेटर डेकोरेशनमध्ये ती तीनही बहुचर्चित फोटो गोष्टी होत्याच. चित्रपट सुपर डुपर हिट होताच त्या प्रसंगाची आवश्यकता दिसून आली. राज कपूरमधील निर्माताही अतिशय चतुर होता हे यातून दिसलं.

राज कपूर या नावातच बरेच काही 'इस्टमनकलर' असं सामावलयं. ब्लॅक अँड व्हाईट ते रंगीत असाच त्याचा शो रिल (पडद्यावरचा) आणि रिअल रिल (वास्तवातला) प्रवास आहे. ज्याचा शोध कधीच संपणार नाही. पृथ्वीराज कपूरचा मोठा मुलगा, शम्मी व शशी कपूर यांचा मोठा भाऊ, (कालांतराने पित्याची जबाबदारी) अभिनेता, प्रगल्भ निर्माता, कल्पक दिग्दर्शक, दृश्य माध्यमाची जाण असलेला संकलक, अनेक अभिनेत्रींचा सखा (सोबती), गीत संगीत व नृत्याचा जबरा जाणकार, (राज कपूरच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गाणी हा स्वतंत्र विषय आहे), आर. के स्टुडिओचा मालक ('बरसात'च्या यशानंतर त्याने चेंबूरला स्टुडिओ उभारला. 'आवारा'तील स्वप्नदृश्य याच स्टुडिओत चित्रीत झाले), दूरदृष्टी असलेला आणि त्याच वेळेस 'रुपेरी स्वप्न पाहणारा', ग्लॅमरचा तडका, गॉसिप्सचा राजा, रुढी परंपरा पाळणारा (आर. के. स्टुडिओतील होळी, श्रीगणेशोत्सव) अशा अनेक गोष्टींची केमिस्ट्री असलेला अस्सल फिल्मवाला.'राज कपूर' या नावातच वलय आहे. राज कपूरच्या बहुस्तरीय वैशिष्ट्यांमुळे जगप्रसिद्ध 'टाईम' मॅगझिनने जगातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकात राज कपूरला वरचे स्थान दिले.




१९८८ ची गोष्ट. आपल्या देशातील सर्वात प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार नवी दिल्लीतील सोहळ्यात राज कपूरने स्वीकारल्याची बातमी वृतसंस्थेवर आली आणि काही वेळातच बातमी आली, राज कपूरला कार्यक्रम स्थळीच त्याचा दम्याचा विकार बळावला, त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने इस्पितळात दाखल करण्यात आले आहे. त्या मे महिन्यात जवळपास रोजच राज कपूरच्या तब्येतीविषयी काही बातमी असे. (चॅनेलपूर्वीचे ते युग होतं. ब्रेकिंग न्यूज हा शब्द जन्माला आला नव्हता.) राज कपूरला उपचारासाठी मुंबईत आणले गेले अशा काही बातम्यांमुळे वृत्तपत्र कार्यालयात एक विषय चर्चेत आला, राज कपूरवरचे लेख, फोटो यांची तयारी करुन ठेवावी काय? तेव्ही मुद्रित माध्यमात हाताने हेडिंगचे खिळे लावणे, मजकूर कंपोझ करणे (लायनो हा प्रकार होता), फोटोचा ब्लॉक बनवणे, पान लावून घेणे अशी मोठी प्रक्रिया असतानाच ही तयारी किती दिवस टिकेल हाही प्रश्न होताच. महिन्याभरात ते पान मोडावे लागले आणि गुरुवार दिनांक २ जून १९८८ रोजी संध्याकाळनंतर वृतसंस्थेने बातमी दिली, शोमन राज कपूरचे निधन.

'जोकर' हा राज कपूर अभिनित/निर्मित/दिग्दर्शित महाखर्चिक चित्रपट म्हणून गाजत असतानाच दोन मध्यंतरनी प्रदर्शित झाला. मला आठवतय, ग्रॅन्ट रोडच्या नॉव्हेल्टी थिएटरवरील 'जोकर'चे सर्कसचे अतिशय भव्य दिमाखदार डेकोरेशन पाह्यला आम्हा भावंडांना वडिलांनी आवर्जून नेले होते. चित्रपट संस्कृतीची बहुस्तरीय ओळख होण्यातील ही एक छोटीशीच गोष्ट. पण लक्षात राहणारी.आठवड्याभरातच रसरंगमध्ये बातमी आली, काही दृश्ये कापून 'जोकर' एका मध्यंतरचा करण्यात आला.... 'जोकर' पडला की पाडला यावर पानभर लेख होता. आजही यावर लिहिलं जातेय हे एक प्रकारचे यशच. राज कपूरचा 'संगम' ( १९६४) असाच दोन मध्यंतरचा चित्रपट यशस्वी ठरला.

राज कपूरचे जुने चित्रपट पाहण्यासाठी तेव्हा 'गल्ली चित्रपट' ही संधी. जिस देश मे गंगा बहती है, श्री ४२०, सपनों का सौदागर हे तेथेच पाहिले. मॅटीनी शोला अनाडी, चोरी चोरी पाहिले, अशातच दूरदर्शन आले आणि जागते रहो, छलिया, आवारा पाह्यले. चित्रपट पाहत जाताना 'कलाकारामधील अष्टपैलुत्वा'ची ओळख होत जाते.... आणि 'बॉबी' (१९७३) आला. रोमॅन्टीक वादळच आले. राज कपूरचा कायमस्वरुपी सर्वात तरुण चित्रपट म्हणजे 'बॉबी' हे आजही तो पुन्हा पुन्हा पाहताना दिसतेय. आजची जेन झी आणि जेन अल्फा पिढीने मोबाईलवर यू ट्यूबवर हा चित्रपट पाहिला तरी 'पिक्चरमधला टवटवीतपणा' तोच.

राज कपूर हे एक जबरदस्त रसायन आहे याची ओळख होण्याचा योग 'बॉबी'ने दिला. या प्रेमपटात राजा (ऋषि कपूर) मिसेस ब्रगेन्झा ( दुर्गा खोटे) याना भेटायला त्यांच्या वस्तीत जातो तेव्हा बेल दाबल्यावर बॉबी (डिंपल कापडिया) दरवाजा उघडते तेव्हा तिच्या डाव्या हाताला लागलेले चणा पिठ ती बटा सरकवताना त्या बटांना लागते हे अगदी अस्सेच राज कपूर व नर्गिसच्या खऱ्याखुऱ्या पहिल्या भेटीत घडल्याचे किस्से गाजू लागले. खऱ्या आयुष्यातील गोष्टी चित्रपटात वापरण्याचे ते विशेष कौशल्य होते.

नर्गिस राज कपूरची हुकमी नायिका, तो विवाहित असूनही ते दोघे एकमेकांकडे आकृष्ट झाले. राज कपूरची अधिक ओळख होण्याच्या गोष्टी अनेक. 'संगम 'च्या वेळेस वैजयंतीमालात राज कपूर गुरफटत गेल्याच्या कथा– दंतकथा अनेक. राज कपूरमधील कल्पक दिग्दर्शक आपल्या चित्रपटातील 'अभिनेत्रीं'मधील गुणवत्ता व सौंदर्य (याचा क्रम कसा होता हे राज कपूर जाणे) पडदाभर खुलवायचा हे झीनत अमान (सत्यम शिवम सुंदरम), मंदाकिनी (राम तेरी गंगा मैली) वगैरेतही दिसले. चित्रपट टेबलावर घडतो, त्याचे पटकथा लेखन व संकलन ही या माध्यमाची ताकद असे राज कपूर मानायचा हे त्याच्या कलाकृतीत दिसते. माझा श्वास, माझं स्वप्न, माझं जीवन चित्रपट आहे, हे राज कपूरचे एका मुलाखतीतील बोल त्याच्या व्यक्तिमत्वाची एक ओळख झाली.

आर. के. फिल्मचे बोधचिन्ह यातही राज कपूरमधला दिग्दर्शक दिसतो. 'बरसात'मधील राज कपूर व नर्गिस यांच्या एका उत्कट प्रणय पोझमधून हे बोधचिन्ह जन्माला आले. या जोडीने आर. के. फिल्म आणि अन्य निर्माते व दिग्दर्शक यांच्या एकूण सोळा चित्रपटात एकत्र भूमिका साकारलीय. 'आवारा'मध्ये त्याने वेगळी थीम हाताळली. संस्कार म्हणजे काय? ते अनुवांशिक असतात की आजूबाजूच्या सामाजिक वातावरणाचा त्यावर प्रभाव असतो? याभोवती ही गोष्ट होती.

'श्री ४२०'मध्ये राज कपूरवरील चार्ली चॅप्लीनचा प्रभाव दिसतो. तत्कालिक चित्रपट अभ्यासकांच्या मते, या चित्रपटात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या विचारांचा प्रभाव दिसतो. या चित्रपटात सामाजिक, आर्थिक विषमता दिसते. यातील पदवीधर नायक बेरोजगार आहे. पण प्रामाणिक आहे. त्याच बक्षीस त्याला मिळतेही. काही काम मिळेल अशा अपेक्षेने तो शहरात येतो. येथे त्याला काही वास्तव अनुभव येतात. एके ठिकाणी रस्त्यात भीक मागणारा माणूस त्याला धक्का मारुन म्हणतो, बाजूला हो माझ्या धंद्याची वेळ झाली आहे. नायकाला हा अनुभव अनपेक्षित असतो. नोकरीच्या शोधात शहरात येणाऱ्यांचे शोषण करणारे शहरात आहेत हे या चित्रपटात अधोरेखित होते. आपल्या समस्या, प्रश्न, विवंचना सोडवण्यासाठी जनसामान्यांनी एकत्र यायला हवे हे हा चित्रपट सांगतो. या चित्रपटातील नायिका (नर्गिस) नायकाला सांगते, अप्रामाणिकपणाच्या पैशातून प्रामाणिकपणाचे पदक सोडवणं गैर आहे. हा चित्रपट स्वातंत्र्योत्तर समाजाचे स्वप्नभंग दाखवणारा चित्रपट म्हणून आजही ओळखला जातो.

राज कपूरने आर. के. फिल्म या बॅनरखाली काही चित्रपट निर्माण केले, त्या चित्रपटातही राज कपूरचा सामाजिक जाणीवेचा प्रभाव दिसतो. प्रकाश अरोरा दिग्दर्शित 'बूट पॉलिश' सामाजिक भान राखणारा. शंभू व अमित मिश्रा दिग्दर्शित 'जागते रहो'मध्ये नववास्तववादाची छाया आहे. एका घोटभर पाण्यासाठी मुंबईत रात्रभर दारोदारी फिरणारा खेडवळ नायक हे मध्यवर्ती कथासूत्र. राघु कर्मकार दिग्दर्शित 'जिस देश मे गंगा बहती है'चा नायक (राज कपूर) साधाभोळा आहे. दरोडेखोरांचे हृदय परिवर्तन हे याचे कथासूत्र.

'संगम' हा आर. के. फिल्मचा पहिला रंगीत चित्रपट. यात दोन मित्रांची (राज कपूर व राजेंद्रकुमार) घट्ट मैत्री आहे, प्रेमाचा त्रिकोण आहे (वैजयंतीमाला) आणि त्याच वेळेस याचमुळे दोन मित्रांत पडलेली दरीदेखील आहे. एक मोठाच कॅनव्हास यात आहे. 'संगम'ने राज कपूरला शोमन उपाधी लागली. राज कपूरच्या चौफेर प्रवाहातील हा महत्वाचा फंडा. 'जोकर' हा कायमच चर्चेत असलेला चित्रपट. कधी यशापयशाची तर कधी गुणवत्तेची चर्चा होते. राज कपूरचे स्वप्न अशा टॅगलाइनने चित्रपट रसिकांसमोर आला. सत्यजित राय यांनी 'जोकर'बद्दल म्हटलं होतं, पौगंडावस्थेतील राजूची कथा सांगणारा पहिला भागच दाखवून जरी राज कपूर थांबला असता तरी चाललं असतं. राय यांनी या भागासाठी राज कपूरची तुलना रनुआ या फ्रेंच दिग्दर्शकाशी केली. खरंतर हास्य आणि कारुण्य अथवा खेळकरपणा आणि दुःख यांचे मिश्रण घेऊन 'जोकर' आला.

'जोकर'च्या व्यावसायिक अपयशातून राज कपूर बदलला हे 'बॉबी' सर्वच स्तरावर दाखवतो. 'सत्यम शिवम सुंदरम'देखील प्रेमकथाच. पण जास्त चर्चा झीनत अमानच्या शरीर सौंदर्याची रंगली. राज कपूरमधील दिग्दर्शकावर शोमनने मात केली असेच म्हटले गेले. 'प्रेम रोग' हा पुन्हा त्याच्या मूळ शैलीची गोष्ट असणारा चित्रपट. विधवा पुनर्विवाहाचा मुद्दा यात राज कपूरने मांडलाय. राज कपूर हे स्वतंत्र चित्रपट स्कूल आहे. स्वतः राज कपूर चित्रपती व्ही. शांताराम यांचा प्रचंड आदर करत असे.

मनमोहन देसाईंच्या दिग्दर्शनातील पहिला चित्रपट 'छलिया'मध्येही त्याने भूमिका साकारली. आणि आपला पुत्र रणधीर कपूर दिग्दर्शित 'कल आज और कल' आणि 'धरम करम' या चित्रपटातही भूमिका साकारली. तेथे त्याने दिग्दर्शनीय सूचना अंमलात आणल्या. आपल्या देशातील सिंगल स्क्रीन थिएटर्सपासून सोविएत युनियन, चीन, इराण, मध्य पूर्वेतील देश असा सगळीकडे राज कपूर 'हीरो' झाला. 'आवारा 'ने राज कपूरला विदेशात ओळख दिली. बीबीसी दूरदर्शनवर हा चित्रपट दाखवला गेला. भारतातील सर्वोत्कृष्ट शंभर चित्रपटात 'आवारा'चा समावेश होतो. हे 'दिग्दर्शक राज कपूरचे यश'. हाच राज कपूर संजय खान दिग्दर्शित 'चांदी सोना', 'अब्दुल्ला' अशा चित्रपटात भूमिका कशी बरे साकारतो अशा प्रश्नांवर राज कपूरचे म्हणणे असे, अशा वेळी आपल्यातील दिग्दर्शक सेटबाहेर ठेवतो.

'राज कपूर' या संस्थेबाबत कितीही जाणून घ्यावे तेवढे थोडेच. आपले पिता पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटरमध्ये सर्व प्रकारची कामे करीत या क्षेत्रात पाऊल टाकले. कधी तो रंगमंचावरील विदूषक असे तर कधी 'दीवार' नाटकातील नोकर व पडदे ओढणारा बॅकस्टेज आर्टिस्ट असे. राज कपूर ही एका सरळ रेषेत जाणारी कथा, पटकथा व संवाद नाही. हाच रोमान्सचा राजा दो उस्तादमध्ये मधुबालाचा , दीवानामध्ये सायरा बानूचा, दुल्हा दुल्हनमध्ये साधनाचा, सपनों का सौदागरमध्ये हेमा मालिनीचा (तिचा हा पहिलाच चित्रपट). राज कपूरला संगीताचा कान, दृष्टी (म्हटलं तर श्वासही) होता हे अनेक गाण्यातून ऐकायला आणि पाह्यला मिळते. राज कपूर स्वतः माऊथ ऑर्गन, तबला वाजवण्यात कुशल होता. पुण्यावर त्याचे विशेष प्रेम. लोणीला त्याने शेतजमीन खरेदी करुन 'राज बाग' निर्माण केली. त्यात एक मिनी थिएटरही होते. सत्यम शिवम सुंदरममधील पुराचा प्रसंग येथेच चित्रीत झाला.

या सगळ्या प्रवासात राज कपूरने 'हीना' या प्रेमकथेचे स्वप्न पाहिले होते. दोन गाण्यांचे रेकॉर्डिंगही केले. पण त्यानंतर राज कपूरचे निधन झाल्याने रणधीर कपूरने 'हीना'चे दिग्दर्शन केले. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांना आर. के. स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये 'हीना' दाखवला. केदार शर्मा दिग्दर्शित 'नीलकमल' या चित्रपटापासून कारकीर्द सुरु केलेला 'राज कपूर' अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टींतून घडला, जगला. आपल्या स्टुडिओतील होळीच्या रंगापासून ते आपल्या चित्रपटाचे पोस्टर कसे असावे याची कल्पक आखणी करण्यापर्यंत हा बहुस्तरीय प्रवास आहे. मी मीडियात आल्यावर राजीव कपूरची भूमिका असलेल्या 'जिम्मेदार' या चित्रपटाच्या मुहूर्ताच्या पार्टीत पहिल्यांदा राज कपूरचे लाईव्ह दर्शन घेतले तेव्हा प्रचंड गोरागोमटं असं हे प्रचंड प्रतिभा असलेले व्यक्तिमत्त्व प्रत्यक्षात पाहतोय हे क्षणभर खरंच वाटेना.

मी मीडियात असल्यानेच मला असे अनेक एक्सक्लुझिव्ह सुखद योग आले आणि त्यातच एक राम तेरी गंगा मैली या चित्रपटाच्या प्रदर्शनाचा अनुभव आला आणि ज्यांचे चित्रपट लहानपणापासून पडद्यावर पाहत मोठा झालो त्या राज कपूरच्या आर. के. स्टुडिओ या ऐतिहासिक वास्तूतही अनेकदा तरी जाण्याचा सुखद योग आला.


# माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म २५ डिसेंबर १९२४ रोजी ग्वाल्हेर येथे झाला. त्यांचा आज स्मृतिदिन. यानिमित्ताने जाणून घेऊ त्यांच्याविषयी...

ग्वाल्हेरच्या व्हिक्टोरिया कॉलेजमधून हिंदी, इंग्रजी आणि संस्कृतमध्ये बीए करण्यापूर्वी वाजपेयी यांनी तेथीलच सरस्वती शिशु मंदिरात शिक्षण घेतले, तर कानपूरच्या डीएव्ही कॉलेजमधून राज्यशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले. उत्कृष्ट वक्ते म्हणून, एक राजकारणी म्हणून त्यांचे कौतुक केले गेले.

वाजपेयींनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीला स्वातंत्र्यसैनिक म्हणून सुरुवात केली. १९४२च्या भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून राजकारणाशी त्यांचा पहिला सहभाग होता. विद्यार्थी असताना वाजपेयी यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीने आकर्षित केले. १९३०मध्ये ते स्वयंसेवक बनले. १९४७मध्ये वाजपेयींनी दीनदयाल उपाध्याय – राष्ट्रधर्म (एक हिंदी मासिक), पांचजन्य (एक हिंदी साप्ताहिक) आणि स्वदेश आणि वीर अर्जुन या दैनिकांसाठी पत्रकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. पुढे श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रभावाखाली वाजपेयींनी १९५१मध्ये भारतीय जनसंघात प्रवेश केला.

निवडणुकीच्या राजकारणातील त्यांचा प्रवास १९५७मध्ये सुरू झाला, जेव्हा त्यांनी तीन जागांवर लोकसभा निवडणूक लढवली आणि उत्तर प्रदेशातील बलरामपूर मतदारसंघातून निवडून आले. वाजपेयींनी त्या वर्षी संसद सदस्य म्हणून शपथ घेतली आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना त्यांच्या उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्याने प्रभावित केले. वाजपेयी एक दिवस भारताचे पंतप्रधान होतील असे भाकीत नेहरूंनी केले होते.



दीनदयाल उपाध्याय यांच्या निधनानंतर १९६८मध्ये वाजपेयी यांना जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बनवण्यात आले. त्यानंतरच्या वर्षांमध्ये त्यांनी लालकृष्ण अडवाणी, नानाजी देशमुख आणि बलराज मधोक यांच्यासोबत भारतीय राजकारणात जनसंघाचे अस्तित्व अधिक ठळक करण्यासाठी काम केले.

जून १९७५मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू केली तेव्हा वाजपेयींनी काही महिने तुरुंगात घालवले. त्यांनी अडवाणी आणि भैरोसिंग शेखावत यांच्यासोबत १९८०मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. त्यांची पहिले अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४च्या निवडणुकीत भाजपला ५४५ सदस्यांच्या लोकसभेत फक्त दोन जागा जिंकता आल्या. या पराभवाचा वाजपेयींना विशेष फटका बसला. पक्षाच्या बांधणीसाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. पुढील लोकसभा निवडणुकीत १९८९मध्ये भाजपने ८८ जागा जिंकल्या. वाजपेयी पाच दशकांहून अधिक काळ संसदेचे सदस्य होते. ते दहा वेळा लोकसभेवर आणि दोनदा राज्यसभेवर निवडून आले. त्यांनी तीन वेळा पंतप्रधानपद भूषवले.

पंतप्रधान असताना त्यांनी भारताच्या अणुकार्यक्रमातील एक महत्त्वाचा टप्पा आणि पाकिस्तानशी सशस्त्र संघर्ष पाहिला. ११ मे १९९८ रोजी त्यांनी पोखरणमध्ये ऑपरेशन शक्ती या सांकेतिक नावाखाली तीन भूमिगत अणुचाचण्या केल्याची घोषणा केली. २००९मध्ये वाजपेयींना पक्षाघाताचा झटका आला, ज्यामुळे त्यांचे बोलणे बिघडले. त्यांना स्मृतिभ्रंश आणि दीर्घकालीन मधुमेहाचा त्रासही होता. १६ ऑगस्ट २०१८ रोजी त्यांचे ९३व्या वर्षी निधन झाले. (साभार इंटरनेट)

# उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालय,

**भुमिसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत**

## कलम १९ ची अधिसुचना

याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (३) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (३) नुसार जमिन संपादन करणे आवश्यक असल्याने भुमिसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ याची कलमे ४ ते १५ यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपध्दती अशा जमिनीच्या संबंधात लागू होणार नाही.

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुर्दीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल यांस पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

**जमिनीचे वर्णन**

**गाव :- तुर्भे, तालुका :- पनवेल, जिल्हा:- रायगड**

| अनुक्रमांक | गट/सर्व्हे क्रमांक | संपादीत क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | ३१/२अ | ०.०३३५ |
| २ | ३१/२ब | ०.०३१५ |
| ३ | ३४/१/अ | ०.११९० |
| ४ | ३४/१ब | ०.१६७० |
| ५ | ३५/१ | ०.०३७० |
| ६ | ३५/२ | ०.१४७५ |
| ७ | ३५/३ | ०.०६०० |
| ८ | ३६/१ | ०.०३१८ |
| ९ | ३६/२+७ | ०.०८८० |
| १० | ३६/३ | ०.१४२० |
| ११ | ३६/८ | ०.०२६२ |
| १२ | ३६/९ | ०.०४२३ |
| | एकुण क्षेत्र | ०.९२५८ |

**जमिनीचे वर्णन**

**गाव :- धानसर, तालुका :- पनवेल, जिल्हा:- रायगड**

| अनुक्रमांक | गट/सर्व्हे क्रमांक | संपादीत क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | २९ | ०.१५५० |
| २ | ३८ | ०.३११० |
| ३ | ६० | ०.०२५५ |
| ४ | ६६ | ०.०४९० |
| ५ | ६७ | ०.१४८५ |
| ६ | ६८/१ | ०.३९२० |
| ७ | ६८/२ | ०.१५९० |
| ८ | ६८/३ | ०.०९२५ |
| ९ | ७७/२/१ | ०.१११० |
| १० | ७७/२/२ | ०.१५६७ |
| ११ | ७८ | ०.०१६१ |
| १२ | ७९ | ०.४८४० |
| १३ | ८३ | ०.१५८६ |
| | एकुण | २.२५८९ |

**जमिनीचे वर्णन**

**गाव :- पिसार्वे, तालुका :- पनवेल, जिल्हा:- रायगड**

| अनुक्रमांक | गट/सर्व्हे क्रमांक | संपादीत क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | ३२ | ०.०६५० |
| २ | २९ | ०.०८५० |
| ३ | १२/५+७ | ०.०७६५ |
| ४ | १२/३ | ०.१७८० |
| ५ | १२/४ | ०.०३४० |
| ६ | १२/१/अ | ०.००२० |
| ७ | १३/३० | ०.०२४० |
| ८ | १३/३१अ | ०.०४१० |
| ९ | १३/३२ब | ०.०५२० |
| १० | १३/३२क | ०.०३६५ |
| ११ | १३/३२ड | ०.०३०० |
| १२ | १३/३३+२९ | ०.०५०० |
| १३ | १३/३७ | ०.०३९५ |
| १४ | १४६/१ | ०.१४७० |
| १५ | १३/३६ | ०.०३२५ |
| १६ | १४६/२ | ०.००६० |
| १७ | १४५/९ | ०.११४५ |
| १८ | १४५/१४ | ०.०००५ |
| १९ | १४५/१२ | ०.१४१० |
| २० | १४५/१३ | ०.०६०० |
| २१ | १४७/१ | ०.०४५० |
| २२ | १४७/२ | ०.०६३५ |
| २३ | १४८/१ | ०.००२५ |
| २४ | १४८/२ | ०.००७० |
| २५ | १४९/१ | ०.०१०० |
| २६ | १४९/२ | ०.१०६० |
| २७ | १४९/३ | ०.१५०० |
| २८ | १४९/४ | ०.०२३० |
| २९ | १४९/६ | ०.००७५ |
| ३० | १२७/१ | ०.०७०० |
| ३१ | १२७/२ | ०.१६८५ |
| ३२ | १२७/५ | ०.०२६५ |
| ३३ | १२१/४ | ०.१२८० |
| ३४ | १२१/२ | ०.०६२५ |
| ३५ | १२१/१ | ०.०८९५ |
| ३६ | ११८/१/१ | ०.१९५० |
| ३७ | ११५/२ | ०.०४५५ |
| ३८ | ११७/१ | ०.०३४५ |
| ३९ | ११७/२ | ०.०१४० |
| ४० | ११६ | ०.१६२५ |
| ४१ | ११५/३अ | ०.१६०० |
| ४२ | ११५/३ब | ०.०६५० |
| ४३ | ११५/३क | ०.१३१० |
| ४४ | ११०/१+२+२ | ०.१८९० |
| ४५ | १११ | ०.०६९५ |
| | एकुण | ३.२४०५ |

### अनुसूची–दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**अधिसूचना :– प्रकल्पाचे नाव :–** :– पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे तुर्भे, धानसर, पिसार्वे, ता. पनवेल, येथील जमीन (मुंबई मेट्रो मार्ग–१२ कल्याण–तळोजा) क्षेत्र ६.४२५२ चौ.मी. मौजे पिसार्वे, ता. पनवेल येथील तळोजा फेज–१, लगतचा सर्व्हे नं.१११ पासून ते मौजे–धानसर, ता. पनवेल येथील स.नं.२९ पर्यंतचा २४.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधित भूखंडाचे रस्ता रुंदीकरण करणेकामी प्रयोजन.

निर्गमित :– प्रकल्प कार्याचे वर्णन :– पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे तुर्भे, धानसर, पिसार्वे ता. पनवेल येथील जमिन (मुंबई मेट्रो मार्ग–१२ कल्याण–तळोजा) मौजे तुर्भे, ता. पनवेल येथील स.नं. ३१/२अ ते स.नं.३६/९, मौजे धानसर, ता. पनवेल येथील स.नं.२१ ते स.नं.८३ व मौजे पिसार्वे, ता. पनवेल येथील स.नं.३२ ते स.नं.१११ संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे क्षेत्र ६.४२५२ चौ.मी. रस्ता रुंदीकरण बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे.

करण्यापूर्वी :– समाजाला मिळणारे लाभः पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

### अनुसूची–तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :– निरंक

### अनुसूची–चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : मौजे तुर्भे, धानसर, पिसार्वे, ता. पनवेल येथील जमीन भूसंपादन (मुंबई मेट्रो मार्ग–१२ कल्याण–तळोजा) क्षेत्र ६.४२५२ चौ.मी. मौजे–पिसार्वे, ता. पनवेल येथील तळोजा फेज–१, लगतचा सर्व्हे नं.१११ पासून ते मौजे धानसर, ता. पनवेल येथील स.नं.२९ पर्यंतचा २४.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधित भूखंडाचे रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. या जमिनी संपादन करण्यामुळे केवळ ७० खातेदार बाधीत होत आहेत व खातेदार विस्थापित होत नाही. पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदींनुसार सामाजिक परिणाम निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही.

सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

टिप :– उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ११/०८/२०२६**

**सही/–**
**(पवन चांडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

## BY THE SUB DIVISIONAL OFFICER PANVEL, SUB DIVISION PANVEL

**NOTIFICATION OF SECTION 19 UNDER RIGHT TO GET APPROPRIATE COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION, RESETTLEMENT ACT 2013**

Accordingly, the District Magistrate of Raigad District, having good governance, has enacted the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (2013). In exercise of the powers conferred by sub-section (1) of section 13 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") and section 126 (3) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") Land described in more detail in Schedule One hereto annexed is required or is likely to be required for the public purposes specified in more detail in Schedule Two;

And whereas, since the acquisition of land is necessary pursuant to Section 126(3) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the right to receive fair compensation during the process of land acquisition, rehabilitation, and resettlement Furthermore, the procedure specified in Sections 4 to 15 of the Right to Transparency Act, 2013, shall not apply in respect of such land.

And whereas, the District Magistrate of Raigad District, after considering the report, if any, made under sub-section (2) of section 15, is satisfied that the said land needs to be modified for the said public purpose; and therefore, under the said Act, It is hereby declared that the said land is required for the said public purpose in terms of sub-section (1) of section 19.

And whereby the areas described in more detail in Schedule III are designated as Rehabilitation Areas for the purpose of rehabilitation and rehabilitation of the affected families, the summary of the Rehabilitation and Resettlement Scheme is specified in Schedule Four

AND WHEREAS, the District Collector under Clause (g) of Section 3 of the said Act is deputing the Suh Divisional Officer Panvel, Sub Division Panvel, (Old Thana Naka) to perform the functions of the Collector under the said Act;

**Schedule-1**

**Description of the Land**

**Village :- Turbhe, Tal. :- Panvel, District :- Raigad**

| Sr.No. | S.No./H.No. | Acquired Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 1 | 31/2A | 0.0335 |
| 2 | 31/2B | 0.0315 |
| 3 | 34/1/A | 0.1190 |
| 4 | 34/1B | 0.1670 |
| 5 | 35/1 | 0.0370 |
| 6 | 35/2 | 0.1475 |
| 7 | 35/3 | 0.0600 |
| 8 | 36/1 | 0.0318 |
| 9 | 36/2+7 | 0.0880 |
| 10 | 36/3 | 0.1420 |
| 11 | 36/8 | 0.0262 |
| 12 | 36/9 | 0.0423 |
| | Total | 0.9258 |

**Description of Land**

**Village : Dhansar, Taluka : Panvel, District : Raigad**

| Sr.No. | S.No./H.No. | Acquired Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 1 | 29 | 0.1550 |
| 2 | 38 | 0.3110 |
| 3 | 60 | 0.0255 |
| 4 | 66 | 0.0490 |
| 5 | 67 | 0.1485 |
| 6 | 68/1 | 0.3920 |
| 7 | 68/2 | 0.1590 |
| 8 | 68/3 | 0.0925 |
| 9 | 77/2/1 | 0.1110 |
| 10 | 77/2/2 | 0.1567 |
| 11 | 78 | 0.0161 |
| 12 | 79 | 0.4840 |
| 13 | 83 | 0.1586 |
| | Total Area | 2.2589 |

**Description of Land**

**Village : Pisarve, Taluka : Panvel, District : Raigad**

| Sr.No. | S.No./H.No. | Acquired Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 1 | 32 | 0.0650 |
| 2 | 29 | 0.0850 |
| 3 | 12/5+7 | 0.0765 |
| 4 | 12/3 | 0.1780 |
| 5 | 12/4 | 0.0340 |
| 6 | 12/1/A | 0.0020 |
| 7 | 13/30 | 0.0240 |
| 8 | 13/31A | 0.0410 |
| 9 | 13/32B | 0.0520 |
| 10 | 13/32C | 0.0365 |
| 11 | 13/32D | 0.0300 |
| 12 | 13/33+29 | 0.0500 |
| 13 | 13/37 | 0.0395 |
| 14 | 146/1 | 0.1470 |
| 15 | 13/36 | 0.0325 |
| 16 | 146/2 | 0.0060 |
| 17 | 145/9 | 0.1145 |
| 18 | 145/14 | 0.0005 |
| 19 | 145/12 | 0.1410 |
| 20 | 145/13 | 0.0600 |
| 21 | 147/1 | 0.0450 |
| 22 | 147/2 | 0.0635 |

पान ७ वर

# 'एकही आदिवासी बांधव कुड्याच्या घरात राहणार नाही'-आमदार महेश बालदी

**पनवेल : प्रतिनिधी**

"माझ्या उरण मतदारसंघातील एकही आदिवासी बांधव कुड्याच्या घरात राहणार नाही, तो पक्क्या घरात राहील, यासाठी माझे कायम प्रयत्न आहेत. आणि हे मी पूर्ण करून दाखवीन," अशी ठाम ग्वाही त्यांनी आपल्या भाषणातून दिली. अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य शैक्षणिक साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने आज मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात कर्जत फाटा येथील एन. डी. स्टुडिओ येथे आयोजित या कार्यक्रमात हजारो विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, छत्री आणि वह्यांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी बोलतांना व्यक्त केले.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाला माजी आमदार देवेंद्र साटम, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आयोजक अशोक छाजेड, सौ.संगीता अशोक छाजेड, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल मेहुल, प्रांत अधिकारी प्रकाश



सकपाळ, तहसीलदार अभय चव्हाण, एन डी स्टूडियो चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत साजणीकर, मुख्य लेखाधिकारी चित्रलेखा खातू, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, जिल्हा परिषद सदस्या नेहा पारंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, सरपंच रीतू ठोंबरे, सुधीर ठोंबरे, भाजपचे मंडल अध्यक्ष प्रवीण मोरे, अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्ट चे उपाध्यक्ष संतोष खांडेकर यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आमदार महेश बालदी यांनी अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टच्या सामाजिक उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले, "विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविणारा हा उपक्रम आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे मनःपूर्वक आभार. ८० व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आजचा दिवस विद्यार्थी आणि आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचा आहे.

आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने एन. डी. स्टुडिओ पाहण्याची संधी मिळणे ही विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणीच आहे. एन. डी. स्टुडिओच्या पुनरुज्जीवनाचा उल्लेख करताना आमदार बालदी म्हणाले, "आमचे परममित्र नितीन चंद्रकांत देसाई यांच्या निधनानंतर हा स्टुडिओ ओसाड झाला होता. मात्र, नितीन देसाई यांच्यावर असलेले प्रेम आणि कलाकार म्हणून त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नामदार आशिष शेलार यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आणि या स्टुडिओला नवसंजीवनी दिली. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.अशोक छाजेड यांच्या कुटुंबाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांचा उल्लेख करताना आमदार बालदी म्हणाले, "अशोक छाजेड यांच्या वडिलांपासून आमचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सामाजिक उपक्रम करणे हे छाजेड कुटुंबाचे एक ध्येय राहिले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात हा उपक्रम राबविण्यात आला आहे. समाजाबद्दलची आस्था या उपक्रमातून अधोरेखित झाली आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेमध्ये मायक्रो प्लॅनिंग महत्त्वपूर्ण ठरले आहे." अशा शब्दांत त्यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत साहित्याची मदत देऊन गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या मनातील न्यूनगंड दूर करणे आणि त्यांना आत्मविश्वासाने शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिल्यास शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक गतिमान होऊ शकते. या भावनेतून अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टने सातत्याने सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा कायम ठेवली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र पर्वावर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणारा हा उपक्रम केवळ शैक्षणिक साहित्य वाटपापुरता मर्यादित न राहता, 'शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी' यांचा संदेश देणारा ठरला. हजारो विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुललेले आनंदाचे हास्य आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मिळालेली प्रेरणा हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती ठरली.



## घरोघरी तिरंगा मोहिमेत राष्ट्रभक्तीचे अनोखे दर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांच्या मनावर उमलत्या वयातच राष्ट्रभक्तीचे व देशप्रेमाचे संस्कार व्हावेत यादृष्टीने 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' मोहीमेच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या व खाजगी शाळांमध्ये ९ ऑगस्टपासून विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे महापालिका शिक्षण विभागामार्फत सूचित करण्यात आले होते. त्यास अनुसरून शालेय स्तरावर नानाविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

'वंदेमातरम्' या राष्ट्रीय गीताला यावर्षी १५० वर्षे पूर्ण होण्याच्या अनुषंगाने यावर्षीची 'हर घर तिरंगा' मोहीम 'वंदे मातरम्' या संकल्पनेवर आधारित ठेवण्यात आलेली असून अनेक शाळांमध्ये दररोज 'वंदे मातरम्' गीत ध्वनीक्षेपकाव्दारे वाजविले जात आहे. त्याचप्रमाणे काही शाळांमध्ये 'वंदे मातरम्' गीताचे समुह गायनही आयोजित करण्यात आले.विद्यार्थ्यांनीच एकत्र येऊन कल्पकतेने तयार केलेल्या तिरंगा सेल्फी स्टँडी उपक्रमासही अनेक शाळांमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला.

१४ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण देशात 'फाळणी भयावहता स्मृतीदिवस' म्हणून पाळण्यात येत असून यानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने १३ ऑगस्टपासून विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या फाळणीविषयक माहितीप्रद प्रदर्शनाला नमुंमपा शाळा क्र. ११० प्रमाणेच काही शाळांनी विद्यार्थी भेट घडवून आणून विद्यार्थ्यांच्या माहितीत स्वातंत्र्यविषयक जाणीव जागृती करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

काही शाळांमध्ये राष्ट्रध्वजामधील तीन रंगांचे कागद वापरून विविध आकर्षक वस्तू बनविण्यात आल्या व त्याचे प्रदर्शन मांडण्यात आले. यामधील विशेष उपक्रम म्हणजे नमुंमपा शाळा क्र. ११७ या शाळेतील विद्यार्थिनींनी तिरंगी राख्या तयार करून त्या भारतीय तटरक्षक जवानांच्या हातावर बांधल्या.

रा.फ.नाईक विद्यालय बोनकोडे, गुरू गोविंदसिंह एज्युकेशन अकॅडमी सेक्टर १९ नेरूळ या शाळांनी भव्यतम रॅली काढून राष्ट्रभक्तीचा जागर केला.पीएमश्री नमुंमपा सीबीएससी शाळा क्र. ९४ कोपरखैरणे यांनी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्याविष्कार सादर केले. सिग्नल शाळेतील विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजात असलेल्या तीन रंगांचा कागद वापरून कागदी फेटे तयार केले.

बहुतांशी शाळांमध्ये माहितीपटाद्वारे 'हर घर तिरंगा' अंतर्गत राष्ट्रध्वजाची माहिती तसेच 'वंदे मातरम्' गीताची माहिती दिली.उपक्रमांमध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक व ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

## युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

यु. ई. एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स अ‍ॅण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिवस मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर ह्यांनी तिरंग्याला आदराने फडकावून मानवंदना दिली.

व्यासपीठावर उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, खजिनदार अ‍ॅड. अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्यु.कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक,प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, पीटीएचे सदस्य तसेच व्यासपीठासमोर शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माध्यमिक विभागातील विदयार्थ्यांनी संगीत शिक्षकाच्यामार्गदर्शनाखाली यु. ई. एस. गौरव गीत सादर केले. विदयार्थ्यांनी तिरंग्याप्रती आदर व्यक्त केले.

## सेंट लॉरेन्स शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

सेंट लॉरेन्स हायस्कूल वाशी येथे २०२६-२७ मध्ये १५ ऑगस्ट हा दिवस अतिशय थाटामाटाने आनंदाने, उत्साहाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सैनिकी मार्च पास, ध्वजवंदन, वंदे मातरम आणि राष्ट्रीय गीत प्रथम क्रीडांगणात घेऊन करण्यात आली. त्यानंतर बायबल ग्रंथ वाचन, स्तवन घेऊन प्रभू स्मरण करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या सायरा




केनेडी यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक उच्च माध्यमिक आणि प्राथमिक विभाग यांचा संपूर्ण कार्यक्रम अतिशय उत्साहात शाळेत पार पडला.

सेवानिवृत्त कमांडर दीपक मोरे. डी. एच. सुब्रमण्यम,असिस्टंट व्हॉइस प्रेसिडेंट ,फाउंडर प्रेसिडेंट अशा कारकीर्द गाजवणाऱ्या नामांकित व्यक्तींना शाळेत बोलावण्यात आले त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देऊन देशाबद्दल आपुलकी वाटावी आणि जबाबदारीची जाणीव सतत त्यांना व्हावी त्याकरिता उपदेश पर भाषण दिले. त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

देशामध्ये आम्ल पदार्थांचे सेवन होऊ नये याकरता गव्हर्नमेंट जीआर नुसार शाळेत प्रतिज्ञा घेण्यात आली आणि विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांचे सेवन धोकादायक कसे असू शकते याची जाणीव करून देण्यात आली.

# नवी मुंबई मनपा मुख्यालयात महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण

**नवी मुंबई : बातमीदार**

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या प्रांगणात महापौर सुजाता पाटील यांच्या शुभहस्ते आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, महिला व बालकल्याण समिती सभापती सलुजा सुतार, नगरसेविका नेत्रा शिर्के अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस, अग्निशमन जवान व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुरक्षारक्षक यांच्या पथकांची याप्रसंगी लक्षणीय उपस्थिती होती.

ध्वजारोहणानंतर देशातील सर्वात स्वच्छ शहरांच्या सुपर स्वच्छ लीग या विशेष कॅटेगरीत मानांकनप्राप्त शहर तसेच माझी वसुंधरा अभियानात राज्यात व्दितीय क्रमांकाचे पर्यावरणशील शहर म्हणून मानांकित नवी मुंबई शहराच्या नावलौकिकात समर्पित भावनेने काम करून भर घालणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य, उद्यान, पाणीपुरवठा व मलनिःस्सारण व्यवस्थापन विभागातील १२ गुणवंत कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्रोजेक्ट मुंबई आणि माईंडस्पेस आरईआयटी यांच्या सहयोगातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या संकलित प्लास्टिकवर पुनर्प्रक्रिया करून त्यापासून बनविलेल्या १०० कचराकुंड्या व ६५ गार्डन बेंचेसचे मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले.

वंदे मातरम् या राष्ट्रीय गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने यावर्षीची हर घर तिरंगा मोहीम वंदे मातरम् या गीतास समर्पित असल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यालयामध्ये केंद्र सरकारच्या संस्कृति मंत्रालयाने प्रकाशित केलेले तिरंगा व वंदे मातरम् माहितीप्रद प्रदर्शन लावण्यात आलेले



आहे. महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ.कैलास शिंदे व इतर मान्यवरांनी या प्रदर्शनाची पाहणी करीत नवी मुंबईकर नागरिकांनी आपला प्रेरणादायी इतिहास जाणून घेण्यासाठी १७ ऑगस्टपर्यंत मुख्यालयात ठेवण्यात येणाऱ्या या तिरंगा व वंदे मातरम् प्रदर्शनाला आपल्या मुलांसह आवर्जून भेट द्यावी असे आवाहन केले आहे.

मुख्यालयाच्या अंतर्गत दर्शनी भागात काढलेली वंदे मातरम् राष्ट्रीय गीताच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त अभिवादन करीत 'घरोघरी तिरंगा घरोघरी स्वच्छता' हा संदेश प्रसारित करणारी काढलेली आकर्षक रांगोळी आणि 'घरोघरी तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा झेंड्याच्या सेल्फी पॉईंटसोबत उपस्थित नागरिकांनी उत्साहाने छायाचित्रे काढली.

नमुंमपा मुख्यालय इमारतीला १४ ऑगस्टपासूनच नयनरम्य तिरंगी विद्युत रोषणाई करण्यात आलेली असून त्यामुळे आयकॉनिक वास्तू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुख्यालय इमारतीच्या आकर्षणात भर पडलेली आहे. नमुंमपा मुख्यालय इमारत तिरंगी रंगात अधिक तेजस्वीपणे झळाळताना दिसत असून नागरिक मोठ्या संख्येने मित्र, परिवारासह एकत्र येऊन रात्री तिरंगी झळाळी असलेल्या मुख्यालय वास्तुसोबत उत्साहाने छायाचित्रे काढताना दिसत आहेत. १६ ऑगस्टपर्यंत ही विद्युत रोषणाई असणार आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या प्रांगणात महापौर पीसुजाता पाटील यांच्या शुभहस्ते आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण संपन्न झाले.

ध्वजारोहणानंतर देशातील सर्वात स्वच्छ शहरांच्या सुपर स्वच्छ लीग या विशेष कॅटेगरीत मानांकनप्राप्त शहर तसेच माझी वसुंधरा अभियानात राज्यात व्दितीय क्रमांकाचे पर्यावरणशील शहर म्हणून मानांकित नवी मुंबई शहराच्या नावलौकिकात समर्पित भावनेने काम करून भर घालणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य, उद्यान, पाणीपुरवठा व मलनिःस्सारण व्यवस्थापन विभागातील १२ गुणवंत कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्रोजेक्ट मुंबई आणि माईंडस्पेस आरईआयटी यांच्या सहयोगातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या संकलित प्लास्टिकवर पुनर्प्रक्रिया करून त्यापासून बनविलेल्या १०० कचराकुंड्या व ६५ गार्डन बेंचेसचे मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले.

वंदे मातरम् या राष्ट्रीय गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने यावर्षीची हर घर तिरंगा मोहीम वंदे मातरम् या गीतास समर्पित असल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यालयामध्ये केंद्र सरकारच्या संस्कृति मंत्रालयाने प्रकाशित केलेले तिरंगा व वंदे मातरम् माहितीप्रद प्रदर्शन लावण्यात आलेले आहे. महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ.कैलास शिंदे व इतर मान्यवरांनी या प्रदर्शनाची पाहणी करीत नवी मुंबईकर नागरिकांनी आपला प्रेरणादायी इतिहास जाणून घेण्यासाठी १७ ऑगस्टपर्यंत मुख्यालयात ठेवण्यात येणाऱ्या या तिरंगा व वंदे मातरम् प्रदर्शनाला आपल्या मुलांसह आवर्जून भेट द्यावी असे आवाहन केले आहे.

मुख्यालयाच्या अंतर्गत दर्शनी भागात काढलेली वंदे मातरम् राष्ट्रीय गीताच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त अभिवादन करीत 'घरोघरी तिरंगा घरोघरी स्वच्छता' हा संदेश प्रसारित करणारी काढलेली आकर्षक रांगोळी आणि 'घरोघरी तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा झेंड्याच्या सेल्फी पॉईंटसोबत उपस्थित नागरिकांनी उत्साहाने छायाचित्रे काढली.

# करंजाडे येथील आदिवासी वाड्यांमध्ये विशेष जातप्रमाणपत्र वितरण शिबिर

**करंजाडे : रामप्रहर वृत्त**

देशाच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल तसेच तहसीलदार कार्यालय, पनवेल यांच्यावतीने करंजाडे परिसरातील आदिवासी वाडी, गायकर वाडी, लालवाडी व वरची वाडी येथील आदिवासी बांधव तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष जात प्रमाणपत्र वितरण शिबिर आयोजित करण्यात आले. शासनाच्या "शासन आपल्या दारी" या संकल्पनेच्या माध्यमातून महसूल प्रशासनाने आदिवासी बांधवांच्या वाड्यांपर्यंत पोहोचून आवश्यक महसुली सेवा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम यावेळी राबविण्यात आला.

या शिबिराचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी जात प्रमाणपत्रासाठी अर्ज व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात आली आणि अवघ्या चार दिवसांत प्रमाणपत्रांची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने संबंधित लाभार्थ्यांना प्रत्यक्ष प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले यामुळे वाडीतील नागरिकांना तहसील कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता भासली नाही.



या उपक्रमांतर्गत पाच वर्षांच्या बालकांपासून ते ६५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटातील आदिवासी बांधवांना जात प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांना भविष्यातील शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, शासकीय योजना व विविध आरक्षणाच्या लाभांसाठी जात प्रमाणपत्राचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

उपविभागीय अधिकारी, पनवेल पवन चांडक यांनी स्वतः आदिवासी वाडीमध्ये उपस्थित राहून लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वितरण केले. यावेळी त्यांनी आदिवासी बांधवांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडचणी, महसुली प्रश्न आणि शासकीय योजनांबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी जात प्रमाणपत्र हे पुढील पिढ्यांसाठी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व शासकीय हक्कांशी संबंधित महत्त्वाचे दस्तऐवज आहे, त्यामुळे त्याचे योग्य प्रकारे जतन करावे, असे आवाहन केले. तसेच आदिवासी समाजाच्या परंपरागत वस्ती, सांस्कृतिक वारसा, पारंपरिक हक्क आणि जमिनींचे संरक्षण व संवर्धन करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

या उपक्रमाचे आयोजन उपविभागीय अधिकारी, पनवेल पवन चांडक तसेच तहसीलदार, पनवेल मीनल भोसले भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच नायब तहसीलदार राजश्री जोगी यांचेही या उपक्रमासाठी मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी करंजाडे ग्रामपंचायत अधिकारी मनीषा जायभाये यांचे सहकार्य लाभले. तसेच करंजाडे ग्रामपंचायत सरपंच मंगेश शेलार यांचे विशेष सहकार्य प्राप्त झाले. पोलीस पाटील कुणाल लोंढे यांनी आदिवासी वाडीतील नागरिकांना जात प्रमाणपत्राच्या प्रक्रियेसाठी आवश्यक सहकार्य केले. तसेच आदिवासी सामाजिक कार्यकर्त्या हेमा पवा यांनीही नागरिकांशी समन्वय साधत या उपक्रमासाठी विशेष सहकार्य केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ऐरोली आणि मुंबई विद्यापीठाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीवरील एक वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम डॉ. आस्मारकामध्ये सुरू असून त्याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

एनईपीनुसार एका वर्षात दोन सत्रात हा अभ्यासक्रम सुरू असून शनिवार आणि रविवारी याचे वर्ग असतात. मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही माध्यमातून प्रवेश उपलब्ध असून ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी दि. २० ऑगस्ट २०२६ ही प्रवेशाची शेवटची तारीख आहे.

हा अभ्यासक्रम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, से-१५, ऐरोली, नवी मुंबई येथे तसेच जे.पी.नाईक भवन, पहिला मजला, कलिना, सांताक्रूझ(पूर्व), मुंबई येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र, मुंबई विद्यापीठ, कलिनाचे संचालक प्रा.वाल्मीक के.सरवदे यांच्या नियंत्रणाखाली सुरू असून मुंबई विद्यापीठाकडून याचे मूल्यांकन आणि प्रमाणपत्र प्राप्त होणार आहे. प्रवेशाकरीता वयाची अट नसून मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेतील पदवीधरांकडूनअर्ज स्विकारले जातील

या अभ्यासक्रमाविषयी अधिक माहितीसाठी कोणीही व्यक्ती मुंबई विद्यापीठ कार्यालयाच्या ९३७२७३४२४७, ७३५०४०८६८६ या संपर्कध्वनी क्रमांकावर अथवा नवी मुंबई महानगरपालिकेचे समाजसेवक .दशरथ गंभीरे यांच्याशी ९७०२३०९०५४ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

# रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण



**रोहा : प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक संस्थाच्या प्रांगणात ध्वजारोहण उत्साहात पार पडला.

रोहा अष्टमी नगरपरिषदेचे ध्वजारोहण नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार अनिकेत तटकरे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, निता हजारे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगरसेवक अजित मोरे, माज सवाल, सुप्रिया जाधव, माजी नगरसेवक सुभाष राजे, समिर सकपाळ, शिवसेना शहर प्रमुख प्रकाश कोळी, आप्पा शेडगे आदिसह निवृत्त सैनिक, रोहा अष्टमी नागरिक, नगरपरिषद कर्मचारी, विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते. यावेळी निवृत्त सैनिक यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

रोहा तहसीलदार कार्यालय येथे उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी आ.अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, तहसीलदार किशोर देशमुख, नायब तहसीलदार राजेश थोरे, पुंडलिक मोकल, उज्वला अंधारे, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, मोतीशेठ जैन, वसंत शेलार, अनिता शेडगे आदीसह रोहा अष्टमी नागरिक, नगरपरिषद, तहसील, पोलीस ठाणे येथील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

रोहा पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक अभय खाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले असून यावेळी साहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे, उपनिरीक्षक सलमान खतीब, याकुब तडवी यांच्यासह रोहा पोलिस ठाण्यातील ३५ पोलिस अंमलदार उपस्थित होते.

रोहा पंचायत समिती येथे सभापती विजया पाशिलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी अमृता उंदरेपाटील, उपसभापती संजय मांडलुस्कर, गटनेते किसनराव मोरे, पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, जगन्नाथ धनावडे, अरुणा हंबीर, तालुका आरोग्य अधिकारी प्रियंका साळुंखे, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे आदी उपस्थित होते.

## खालापूर पंचायत समिती येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला, सभापती कृष्णा पारंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण व उप सभापती भाई शिंदे, गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या उपस्थितीत पार पडला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, स्वातंत्र्य सेनानी यांच्या लढ्याला यश येऊन भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करून स्वातंत्र्य दिले, हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी अत्यंत अभिमानाचा व राष्ट्रीय सण आहे. ज्यांनी देशासाठी बलिदान दिले त्यांना आदरांजली वाहतो,असे सभापती कृष्णा पारंगे यांनी प्रतिपादन करून त्यांनी प्लास्टिक मुक्तीची शपथ दिली.



यावेळी पंचायत समिती सदस्य सौ प्रमिला पाटील, सौ.गौरी गडगे, सहायक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, गटशिक्षण अधिकारी, माजी उप सभापती उमेश गावंड, सरकारी वकील राजेंद्र येरूनकर, सर्व विभागाचे अधिकारी,कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## कर्ज देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक; रोहा पोलिसांकडून दोघांना अटक

**धाटाव : प्रतिनिधी**

कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोघांना रोहा पोलिसांनी अटक केली आहे. अमोकार रविंद्र हटके (वय ४०, रा. बदलापूर, ठाणे) आणि गौरव संतोष मयेकर ऊर्फ भालचंद्र रघुनाथ पाळव (वय ३४, रा. उलवे, नवी मुंबई) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लियाकत महमद खेत (वय ५०, रा. सुडकोळी, ता. रोहा) यांनी वर्तमानपत्रातील जाहिरात पाहून आरोपींशी संपर्क साधला. जाहिरातीमध्ये व्यावसायिक कर्ज तसेच महिलांसाठी बचत व लघुउद्योगासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. त्यानंतर आरोपींनी फिर्यादींकडून संपर्क साधून कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली १० लाख रुपयांचे कर्ज मिळवून देतो, असे सांगितले.

आरोपींनी कर्ज प्रक्रियेसाठी विविध कारणे सांगून फिर्यादींकडून रक्कम घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणी रोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला.तपासादरम्यान आरोपींकडून ५ लाख रुपये किमतीची ह्युंदाई व्हेर्ना कार, ३० हजार रुपये रोख रक्कम, तसेच सॅमसंग झेड फोल्ड ४ आणि झेड फोल्ड ५ अशी दोन मोबाईल उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. याशिवाय आरोपींनी बनावट नावाने तयार केलेली पासबुक, चेकबुक, लोकांना दिलेल्या पावत्या, आधारकार्ड, चेकबुक आदी कागदपत्रेही पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत.

रोहा पोलिसांनी केलेल्या तपासात आरोपींनी रोहा परिसरातील इतर नागरिकांनाही अशाच प्रकारे कर्ज देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याची शक्यता समोर आली आहे.


## कर्जतमध्ये स्वातंत्र्य दिनाचा ध्वजारोहण सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात विविध गावात ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा उत्साहात संपन्न झाला. विविध शाळा महाविद्यालये, ग्रामपंचायती, संस्थांमध्य स्वातंत्र्य दिना निमित्त विविध पोसरी येथील शिवतीर्थ येथे आमदार महेंद्र थोरवे गीता घारे इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये कु. नेहा घारे, , नगरपरिषदे मध्ये नगराध्यक्ष पुष्पा दगडे, प्रशासकीय भवन मध्ये उपविभागीय प्रकाश संकपाळ, पंचायत समिती मध्ये सभापती नमिता घारे, कोंकण ज्ञानपीठ कर्जत महाविद्यालय अभियांत्रिकी महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालयात माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालयात ग्रंथापाल व नगरसेवक रामदास गायकवाड, अभिनव ज्ञान मंदिर मध्ये संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य, जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत बांधकाम सभापती महेंद्र चंदन, जनता विद्या मंदिर दहिवली येथे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर घुगे, इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिरुद्ध जोशी, स्वातंत्र्यवीर दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतनमध्ये कु. किमया गोडबोले, माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान संस्थेत पद्मजा देशमुख, जय अंबे भवानी विद्यालय भिसेगाव मध्ये माजी पंचायत समिती सदस्य पुंडलिक भोईर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मुख्याध्यापक तसेच ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, प्रशासक यांनी ध्वजारोहण केले.



## ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा; 'वंदे मातरम्'च्या सुरांनी वातावरण भारावले



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालयात आज ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमादरम्यान 'वन्दे मातरम् , राष्ट्रगीत, राज्यगीतच्या धुनांनी उपस्थितांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत केली.

आज सकाळ पासून जोरदार पाऊसाने सुरुवात केल्यानंतर ही विद्यार्थी व देशप्रेमी चा उत्साह कायम होता.ध्वजारोहण वेळी पावासाने विश्रांती घेतल्याने शासकीय वेळेत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत, शासकीय, निमशासकीय कार्यालया मध्ये विविध कार्यक्रमांनी सकाळी ७.३०वाजता ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.नगरपरिषदेच्या प्रांगणात नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या शुभ हस्ते सकाळी कार्यालयातील राजे शिवछत्रपती महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सकाळी ७.३० वाजता कार्यालया जवळील उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

तर ८.१५ वाजता आझाद चौका जवळील नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आला.तर मुरुड तहसीलदार कार्यालयातील प्रांगणात सकाळी ९ वाजुन ५ मिनिटांनी तहसीलदार –आदेश डफळ यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर एस ए. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गोड आवाजात वंदे मातरम् ,राष्ट्रीय गीत व राज्यगीत सादर करण्यात आले.स्वातंत्र्य दिनाचा विजय असो,भारत माता की जय ,जय जवान जय किसान अश्या घोषणा देऊन मानवंदना देण्यात आली.यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी आजादी का अमृत महोत्सव या स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी निवृत्त मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी– नंदकुमार आंबतेकर यांना नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या शुभ हस्ते सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, पाणीपुरवठा सभापती–पांडुरंग आरेकर, बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे बांधकाम सभापती–यास्मिन कादिरी , नगरसेवक मनोज भगत,तमीम ढाकम, नगरसेवक मनिष विरुकुड, नगरसेविका प्रांजली मकु, नगरसेविका –देवायानी गुरव, नगरसेवक नितीन आंबुर्ले, नगरसेवक विजय पाटील,नगरसेविका श्रध्दा अपराध, नगरसेवक आदेश दांडेकर, नगरसेविका प्रमिला माळी, डॉक्टर राज कल्याणी,सतेज निमकर, अनिकेत जगदाळे ,शहर अभियंता –अनिकेत वाजे, प्रकाश आरेकर, नयन कर्णिक, प्रमोद मसाल, अरविंद गायकर, दिलीप गुंजाळ नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी झाले.तिरंग्याच्या रंगांनी सजलेले परिसर आणि देशभक्तीपर घोषणांनी सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तिपर गीते आणि वन्दे मातरम्'च्या स्वरांनी कार्यक्रमाचा उत्साह अधिकच वाढला.

## आदिवासी ठाकूर तरुणांचा स्तुत्य उपक्रम; वृक्ष लागवड करून साजरा केला स्वातंत्र्य दिन

**चौक :** कलोते मोकाशी ठाकूरवाडी तालुका खालापूर जिल्हा रायगड येथील नवतरुण मित्र मंडळ कलोते मोकाशी ठाकूरवाडी येथील तरुणांनी भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिवस विविध प्रकारच्या वृक्ष लागवड करून साजरा केला.हा भाग दुर्गम आणि दुर्लक्षित असून भौगोलिक स्थितीत आजही दळणवळण साधन नाही.जल जंगल चे साम्राज्य असल्याने पर्यावरण पूरक झाडे लावण्याचा उपक्रम त्यांनी घेतला असून, आज भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिवस त्यांनी विविध प्रकारच्या औषधी वनस्पती यांची झाडे लावून साजरा केला.सुमारे तीनशे पन्नास झाडे लावताना त्यांना वन विभागाने अतिशय चांगली मदत केल्याचे निरगुडा यांनी सांगितले.पर्यावरण जगवा, पर्यावरण वाचवा हा संदेश त्यांनी कृतीतून दिला.



पान ५ वरुन

| | | |
|---|---|---|
| 23 | 148/1 | 0.0025 |
| 24 | 148/2 | 0.0070 |
| 25 | 149/1 | 0.0100 |
| 26 | 149/2 | 0.1060 |
| 27 | 149/3 | 0.1500 |
| 28 | 149/4 | 0.0230 |
| 29 | 149/6 | 0.0075 |
| 30 | 127/1 | 0.0700 |
| 31 | 127/2 | 0.1685 |
| 32 | 127/5 | 0.0265 |
| 33 | 121/4 | 0.1280 |
| 34 | 121/2 | 0.0625 |
| 35 | 121/1 | 0.0895 |

| | | |
|---|---|---|
| 36 | 118/1/1 | 0.1950 |
| 37 | 115/2 | 0.0455 |
| 38 | 117/1 | 0.0345 |
| 39 | 117/2 | 0.0140 |
| 40 | 116 | 0.1625 |
| 41 | 115/3A | 0.1600 |
| 42 | 115/3B | 0.0650 |
| 43 | 115/3C | 0.1310 |
| 44 | 110/1+2+2 | 0.1890 |
| 45 | 111 | 0.0695 |
| | Total Area | 3.2405 |

### Schedule II

Details regarding the nature of the public purpose

**Notification:- Project Name :-** Land situated at Mauje-Turbhe, Dhansar, and Pisarve (within the limits of Panvel Municipal Corporation, Taluka-Panvel) for the Mumbai Metro Line-12 (Kalyan-Taloja) project, area 6.4252 sq. m. (Mauje-Pisarve, Taluka-Panvel). Purpose Road widening of plots affected by the 24.00 meter wide Development Plan road extending from the area adjacent to Survey No. 111 in Taloja Phase-1 to Survey No. 29 in Mauje-Dhansar, Taluka-Panvel.

**Issued: Description of project work :** Land situated at Mauje-Turbhe, Dhansar, and Pisarve (Taluka-Panvel) within the limits of Panvel Municipal Corporation (for Mumbai Metro Line-12 Kalyan-Taloja) specifically, Survey Nos. 31/2A to 36/9 at Mauje-Turbhe (Taluka-Panvel) and Survey No. 21 onwards at Mauje-Dhansar (Taluka-Panvel). To expedite the road widening work, an area of 6.4252 sq. m. is required comprising the property listed in the joint statement covering Survey No. 83 and Survey Nos. 32 through 111 at Mauje-Pisarve, Taluka Panvel.

**Benefits to Society:** Given the rapid industrial significance, urbanization, and expansion of Panvel city, the advancement of the community cannot be achieved without acquiring the proposed area. Therefore, widening the road is essential for public purpose.

### Schedule-III

**Reasons necessitating the displacement of the affected person:** Nil

### Schedule-IV

**Summary of Social Impact Assessment:** Land acquisition for the Mumbai Metro Line-12 (Kalyan-Taloja) project covering an area of 6.4252 sq. m. across the villages of Turbhe, Dhansar, and Pisarve (Taluka Panvel) along the 24.00 meter wide Development Plan road extending from Survey No. 111 (adjacent to Taloja Phase-1, Village-Pisarve, Taluka-Panvel) to Survey No. 29 (Village-Dhansar, Taluka-Panvel).

Road widening involving the affected land parcels is essential. The acquisition of this land affects only 70 landholders, none of whom will be displaced. Given the rapid pace of industrialization, urbanization, development, and expansion in Panvel city, the progress of the community cannot be achieved without acquiring the proposed area; therefore, road widening is necessary for public purpose.

Therefore, in the public interest, a Social Impact Assessment study is not required under the provisions of Sections 9 and 40 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

The said land acquisition process should be initiated at the earliest.

Note: The layout plan of the said land may be inspected at the office of the Sub-Divisional Officer, Panvel Sub-Division.

**Place: Panvel**
**Date: 11/08/2026**

**sd/-**
**(Pavan Chandak)**
**Sub-Divisional Officer, Panvel**
**Panvel Sub-Division**

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/११५/११०१/२०२६

# भारताचे मिशन 'ऑलिम्पिक २०३६'

## पंतप्रधान मोदींचे मोठे लक्ष्य; खेळाडूंच्या शोधासाठी देशव्यापी 'टॅलेंट हंट'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०३६च्या ऑलिम्पिकसाठी भारताने आतापासूनच प्रत्येक क्रीडा क्षेत्रात सहभागी होण्याचे ध्येय ठेवले पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दि. (१५) लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात सांगितले. मिशन 'ऑलिम्पिक २०३६'साठी त्यांनी देशभरातील ५ ते १५ वर्षांच्या मुलांसाठी देशव्यापी टॅलेंट हंट कार्यक्रमाची घोषणा केली. लहान वयातच क्रीडा क्षेत्रातील क्षमता ओळखून मुलांना विशेष प्रशिक्षण, आधुनिक सुविधा व आवश्यक सहकार्य दिले जाणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रतिभावान मुलांना शोधून त्यांना जागतिक दर्जाचे खेळाडू बनवणे या उपक्रमाचा उद्देश असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.



पंतप्रधान मोदी म्हणाले की, ऑलिम्पिकमध्ये सुमारे ४० क्रीडा प्रकार आणि जवळपास ३५० स्पर्धा असतात, मात्र भारताला सध्या यातील स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होता येत नाही. २०३६ मध्ये आपण किमान तीन चतुर्थांश ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सहभागी व्हायला हवे, असे लक्ष्य त्यांनी मांडले. यासाठी लहान वयातच मुलांमधील क्रीडा क्षमता ओळखण्यावर भर दिला जाणार आहे.

सरकार देशव्यापी टॅलेंट हंट सुरू करणार असून यामध्ये ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांचा समावेश असणार आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांतून क्रीडा क्षेत्रात चांगली क्षमता असलेल्या मुलांचा शोध घेतला जाणार आहे. निवड झालेल्या मुलांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी तयार केले जाईल.

पंतप्रधान मोदी यांनी ऑलिम्पिक पोडियम योजना तसेच खेलो इंडिया गेम्स, युनिव्हर्सिटी गेम्स, बीच गेम्स आणि विंटर गेम्स यांचा उल्लेख करत भारताच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीवर भर दिला. क्रीडा प्रशिक्षणाबरोबरच स्पोर्ट्स मेडिसिन आणि स्पोर्ट्स न्यूट्रिशन यांसारख्या क्षेत्रांमध्येही भारत वेगाने पुढे जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# केएल राहुलने मोडला गौतम गंभीरचा रेकॉर्ड!

## रोहित शर्मालाही मागे टाकण्याची संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गॉलच्या मैदानावर भारत–इंग्लंड यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना सुरू आहे. भारतीय कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा ६००वा सामना आहे. सामन्यात भारतीय कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीवीर फलंदाज केएल राहुल व यशस्वी जैस्वाल यांनी चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ४७ धावा जोडल्या. यादरम्यान केएल राहुलने भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरचा रेकॉर्ड मोडला आहे.

गौतम गंभीर सध्या भारतीय कसोटी संघाचा मुख्य प्रशिक्षक आहे. केएल राहुलने गौतम गंभीरला कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याच्या रेकॉर्डमध्ये मागे टाकले आहे. हा रेकॉर्ड केएल राहुलने गौतम गंभीरसमोरच मोडून काढला आहे.



या कसोटी सामन्यात फलंदाजीला येण्यापूर्वी केएल राहुलच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये ६८ सामन्यांमध्ये ४१५३ धावा करण्याची नोंद होती, तर गंभीरच्या नावे ४१५४ धावा करण्याची नोंद होती. यादरम्यान चौकार मारताच केएल राहुलने कसोटी क्रिकेटमधील या रेकॉर्डमध्ये गौतम गंभीरला मागे टाकले आहे.

केएल राहुलकडे आता कसोटीत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत रोहित शर्माला मागे टाकण्याची संधी असणार आहे. रोहित शर्माच्या नावे ४३०१ धावा करण्याची नोंद आहे. जर त्याने एक शतक झळकावले, तर तो रोहित शर्मालाही मागे टाकू शकतो. कसोटीमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत सचिन तेंडुलकर अव्वल स्थानी आहे. सचिनच्या नावे सर्वाधिक १५९२१ धावा करण्याची नोंद आहे, तर राहुल द्रविडच्या नावे १२३६५ धावा करण्याची नोंद आहे.

तिसऱ्या स्थानी असलेल्या सुनील गावसकरांच्या नावे १०१२२ धावा करण्याची नोंद आहे, तर चौथ्या स्थानी असलेल्या विराट कोहलीने ९२३० धावा केल्या. व्हीव्हीएस लक्ष्मणने ८७८१ धावा केल्या आहेत. केएल राहुल कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत १३व्या स्थानी आहे.





पनवेल : भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पनवेल तालुका क्रीडा संकुल, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, पनवेल महानगरपालिका मुख्यालय, उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल येथे मोठ्या उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मान्यवर, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वातंत्र्यदिनाचा आनंद साजरा केला.

























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com